७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. ०८ मे २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १३२ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

# देशात आधुनिक जलवाहतुकीचा नवा अध्याय सुरू होणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : महाराष्ट्र सागरी मंडळ आणि नॉर्वेच्या मे.हायके एएस यांच्यात सामंजस्य करार

मुंबई (दै. संध्या)

मुंबई महानगर प्रदेशातील वाढत्या वाहतूक गरजांसाठी शाश्वत आणि पर्यावरणपूरक जलवाहतूक व्यवस्था उभारण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पामुळे देशात आधुनिक जलवाहतुकीचा नवा अध्याय सुरू होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पासाठी महाराष्ट्र सागरी मंडळ आणि नॉर्वेस्थित मे. हायके एएस या सागरी तंत्रज्ञान कंपनीदरम्यान सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पासाठी आधुनिक जलयाने उपलब्ध करून देणे तसेच महाराष्ट्रात जहाजबांधणी सुविधा निर्माण करण्यासाठी हा करार महत्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे प्रमुख सल्लागार (गुंतवणूक आणि धोरण) कौस्तुभ धवसे, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी. नॉर्वेच्या मानद कॉन्सुल जनरल मोनिका नागेलगार्ड, स्वीडनचे कॉन्सुल जनरल स्वेन ऑस्टरबर्ग, हायकेचे अध्यक्ष चार्ल्स पेम्ब्रोक बिर्स आदी उपस्थित होते.



या सामंजस्य करारावर महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी. आणि नॉर्वेच्या मे. हायके एएसचे अध्यक्ष चार्ल्स पेम्ब्रोक बिर्स यांनी स्वाक्षरी केली. वर्षा निवासस्थानी हा करार झाल्यानंतर उपस्थितांना संबोधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या दहा वर्षांपासून शाश्वत जलवाहतुकीच्या संकल्पनेवर राज्य शासनाचे सातत्याने काम सुरू आहे. मुंबईत जलवाहतुकीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचा संपूर्ण आराखडा आता तयार झाला असून, त्यासाठी आधुनिक आणि शाश्वत नौकांची आवश्यकता होती. मुंबईसारख्या महानगरात जलमार्गांचा प्रभावी वापर केल्यास वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होईल. देशभरात जलवाहतुकीसाठी मोठ्या संधी उपलब्ध असून, आगामी काळात शाश्वत वॉटर ट्रान्सपोर्टची मागणी झपाट्याने वाढणार आहे. मुंबईत सुरू होत असलेली ही संकल्पना देशातील इतर शहरांसाठीही मार्गदर्शक ठरेल. या प्रकल्पासाठी सहकार्य करणाऱ्या नॉर्वेच्या मे. हायके एएस यांच्यासह अधिकाऱ्यांचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले. विशेषतः या उपक्रमासाठी सर्वांना एकत्र आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, संबंधित अधिकारी आणि भागीदार संस्थांचेही मुख्यमंत्री यांनी कौतुक केले. यावेळी मस्त्यव्यवसाय व बंदरे मंत्री नीतेश राणे यांनी सांगितले, मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्प हा राज्याच्या सागरी विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. मे. हायके एएस यासारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीसोबत होणारा हा करार महाराष्ट्रातील बंदर विकास, जहाजबांधणी आणि सागरी कौशल्यविकासासाठी नवी दिशा देणारा ठरेल.

### सामंजस्य करारातील महत्वाचे मुद्दे

जलवाहतुकीचा पर्याय हा पर्यावरणपूरक आणि आरामदायी असल्यामुळे, जलवाहतुकीस प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र व राज्य सरकार प्रयत्नशील आहे. एमएमआरमध्ये प्रवासी जलवाहतुकीसाठी वॉटर मेट्रो प्रकल्प राबविण्यासाठी मे. कोची मेट्रो रेल लि. यांच्यामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला आहे. ह्या डीपीआरमध्ये सध्या प्रवासी वाहतूक होत असलेल्या विद्यमान 21 जलमार्गांवरील 24 टर्मिनलचे अद्ययावतीकरण (अपग्रेडेशन) करणे आणि नव्याने सुरु करावयाच्या 10 नवीन जलमार्गांमध्ये 21 टर्मिनलची निर्मिती करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. हायके एएस ही नॉर्वेमधील सागरी तंत्रज्ञान कंपनी असून शहरी जलवाहतुकीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाने डिझाईन केलेल्या जलयानांचे उत्पादन करण्याच्या क्षेत्रात कार्यरत आहे. मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन बनविलेली जलयाने उपलब्ध करुन देण्याचा कंपनीचा मानस आहे. तसेच, महाराष्ट्रात जहाजबांधणी सुविधा स्थापित करण्यासाठीसुध्दा ही कंपनी इच्छुक आहे. कंपनीच्या विनंतीच्या अनुषंगाने 'इंडिया मेरीटाईम वीक-2025' या कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्र सागरी मंडळाने बंदर विकास सुविधा, जहाजबांधणी, सागरी क्षेत्रातील कौशल्यविकास इ. बाबत विविध घटकांशी परस्पर सामंजस्य करार स्वाक्षांकित केले होते. त्याच धर्तीवर, आता हायके एएस या कंपनीसोबत एमओयू करण्यात आला आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

## ढिंग-टांग




## ब्रेकिंग न्यूज

### इंटर्नशिप योजनेसाठी अर्ज करावेत

मुंबई (दै. संध्या) : केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणारी प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना ही देशातील युवकांना उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळवून देणारी अत्यंत महत्वपूर्ण योजना आहे. या योजनेअंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना देशातील नामांकित कंपन्यांमध्ये ६ ते ९ महिन्याकरिता इंटर्नशिप देण्यात येणार असून प्रतिमहा ९०००/-रूपये एवढे विद्यावेतन अदा करण्यात येणार आहे. ज्या उमेदवार व उद्योजकांना या योजनेत सहभागी व्हायचे आहे त्यांनी मुंबई उपनगरच्या जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र मुंबई उपनगरशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे. जिल्ह्यामध्ये विविध आस्थापनांमध्ये- जसे की रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड, लार्सन आणि टुब्रो लिमिटेड, टाटा कॅपिटल, टायटन इ. नामांकित कंपन्यांमध्ये संधी उपलब्ध आहेत. या योजनेमुळे युवकांना उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव, नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची संधी, व्यावसायिक नेटवर्क तयार होणे, आत्मविश्वास व व्यक्तिमत्व विकास यामध्ये पारंगत इत्यादी बाबींचा मोठा फायदा होणार आहे.

# शासकीय विद्यानिकेतनांतील शिक्षक भरती प्रक्रिया गतीमान करा

## राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर : रोस्टर तपासणी तातडीने पूर्ण करण्याचेही निर्देश



मुंबई (दै. संध्या)

शासकीय विद्यानिकेतनांतील सहाय्यक शिक्षकांची पदभरती 'पवित्र' प्रणालीमार्फत करण्यासाठी रोस्टर तपासणीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले. शासकीय विद्यानिकेतनांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी विविध महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. बैठकीस शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल उपस्थित होते. तसेच दूरदृश्यप्रणालीद्वारे आयुक्त, संचालक, उपसंचालक, संबंधित अधिकारी आणि विद्यानिकेतनचे माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले की, राज्यात विद्यानिकेतनांच्या केवळ पाच शाळा कार्यरत असून, शिक्षक पदभरतीसंदर्भातील सर्व कार्यवाही पुढील पाच दिवसांत पूर्ण करण्यात यावी. 'पवित्र' पोर्टल ३१ मेपर्यंत सुरू असल्याने रोस्टर तपासणीसह इतर आवश्यक प्रक्रिया कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. विद्यानिकेतनांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासगट स्थापन करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

# सायबर सुरक्षेसाठी कठोर कायदे, आधुनिक तपास यंत्रणा आणि जनजागृतीवर भर

## *प्रधान सचिव ब्रिजेश सिंह : 'टेक-वारी २.०' मधून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन*

मुंबई (दै. संध्या)

डिजिटल व्यवहारांचा झपाट्याने वाढणारा वापर आणि त्यासोबत वाढणाऱ्या सायबर फसवणुकीच्या पार्श्वभूमीवर सायबर सुरक्षेसाठी आवश्यक धोरणात्मक बदल, कठोर नियम आणि व्यापक जनजागृतीवर भर देण्यात येत असल्याचे माहिती व जनसंपर्क प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी सांगितले. सायबर गुन्हेगार अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना लक्ष्य करत असून या गुन्हेगारीचे स्वरूप आता पूर्णपणे संघटित आणि 'कॉर्पोरेट' पद्धतीचे बनल्याने अधिक सतर्क राहण्याची आवश्यकता त्यांनी स्पष्ट केली. सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने आयोजित 'टेक-वारी 2.0 – महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताह' अंतर्गत 'इव्हॉल्विंग लँडस्केप इन सायबर सिक्युरिटी – थ्रेट्स, चॅलेंजेस अँड ऑपर्च्युनिटीज' या विषयावरील सत्रात ते बोलत होते. यावेळी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले की, डिजिटल व्यवहार दिवसेंदिवस वाढत असताना केवळ तांत्रिक सुरक्षा उपाय पुरेसे राहिलेले नाहीत. सुरक्षित व्यवहार पद्धतींचा अवलंब आणि नागरिकांची जागरूकताही तितकीच महत्त्वाची बाब आहे. सायबर गुन्हेगार सातत्याने नव्या तंत्रांचा वापर करत असल्याने कायद्यांमध्ये आवश्यक बदल करून अधिक कडक नियम लागू करणे गरजेचे ठरत आहे. त्याचबरोबर तपास यंत्रणांना आधुनिक साधने आणि विशेष प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येत आहे.



सायबर फसवणुकीमागे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि संघटित आर्थिक जाळे कार्यरत असल्याचे सांगताना त्यांनी या प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली. फसवणूक झाल्यानंतर काही मिनिटांतच रक्कम विविध खात्यांत विभागली जाते. त्यासाठी 'म्यूल अकाउंट्स'चा वापर केला जातो. त्यानंतर हे पैसे वेगवेगळ्या व्यवहारांतून पुढे पाठवले जाऊन अखेरीस क्रिप्टोकरन्सीत रूपांतरित केले जातात आणि परदेशात पाठवले जातात.

'हब बिलिंग' पद्धतीने मोठी रक्कम लहान व्यवहारांमध्ये विभागल्यामुळे पैशांचा मागोवा घेणे तपास यंत्रणांसाठी अत्यंत कठीण बनते. या संपूर्ण प्रक्रियेत ठरावीक वेळेत व्यवहार पूर्ण करण्यासाठी 'सर्व्हिस लेव्हल'नुसार नेटवर्क नियंत्रित केले जात असल्याचेही त्यांनी सांगितले. डॉलरशी निगडित स्टेबल कॉइन्स, विशेषतः यूएसडीटीसारख्या माध्यमांतून मोठ्या प्रमाणावर व्यवहार होत असल्याने सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्याचे आव्हान अधिक गंभीर बनले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देशात 'डिजिटल अरेस्ट'सारख्या नव्या प्रकारच्या फसवणुकींनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले असल्याचेही त्यांनी सांगितले. बनावट फोन किंवा व्हिडिओ कॉलद्वारे स्वतःला पोलीस, सीबीआय किंवा अन्य सरकारी अधिकारी म्हणून भासवले जाते आणि नागरिकांना मानसिक दबावाखाली ठेवून लाखो रुपयांची फसवणूक केली जाते.

सायबर गुन्हेगार सोशल मीडियावरील वैयक्तिक माहितीचा वापर करून 'सोशल इंजिनिअरिंग'च्या माध्यमातून नागरिकांना जाळ्यात ओढतात. बनावट संकेतस्थळे, फेक ॲप्स, डीपफेक व्हिडिओ आणि व्हॉईस इम्पर्सनेशनचा वापर वाढत असल्याने नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

म्यानमार, लाओस आणि कंबोडिया येथून विविध भाषांमध्ये भारतीय नागरिकांना लक्ष्य केले जात असल्याचे सांगून ते म्हणाले की, या आंतरराष्ट्रीय जाळ्यांमुळे सायबर गुन्ह्यांचा तपास अधिक गुंतागुंतीचा होत असून क्रिप्टोकरन्सीद्वारे पैसा देशाबाहेर पाठवला जात असल्याने तपास प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## आज दुपारी १ वाजता जाहीर होणार निकाल, बोर्डाकडून मोठी घोषणा

# आज महाराष्ट्र बोर्डाचा दहावीचा निकाल

मुंबई (दै. संध्या)

राज्यातील महाराष्ट्र बोर्डाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी आहे. दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर केला जाणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च 2026 मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेचा निकाल आज जाहीर होणार आहे. शुक्रवार दिनांक 08 मे 2026 रोजी दुपारी 01.00 वाजता निकाल ऑनलाईन पद्धतीनं जाहीर करण्यात येणार आहे.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत निकाल जाहीर करण्यापूर्वी सकाळी अकरा वाजता पत्रकार परिषद देखील घेतली जाणार आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल आज म्हणजेच ८ मे रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर होणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-



मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेचा निकाल आज जाहीर केला जाणार आहे.

फेब्रुवारी-मार्च 2026 मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र अर्थात इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल विद्यार्थ्यांना ऑनलाईन पाहता येणार आहे. निकालाबाबतची अधिकृत वार्ताहर परिषद आज सकाळी 11 वाजता राज्य मंडळ कार्यालयात होणार आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून फेब्रुवारी-मार्च 2026 मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज, 8 मे रोजी दुपारी 1 वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येणार आहे. निकालासंदर्भात सकाळी 11 वाजता राज्य मंडळ कार्यालयात अधिकृत वार्ताहर परिषद आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांचे लक्ष आता आजच्या निकालाकडे लागले आहे.

### निकाल कुठे पाहणार?

https://sscresult.mahahsscboard.in/
https://results.targetpublications.org/
https://results.digilocker.gov.in
https://mahahsscboard.in
https://results.navneet.com

गेल्या काही वर्षांपासून दहावी आणि बारावीचा निकाल विक्रमी वेळेत लावण्याची परंपरा महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं कायम ठेवली आहे. बारावीचा निकाल 2 मे रोजी जाहीर केल्यानंतर आता दहावीचा निकाल देखील 8 मे म्हणजेच आजच जाहीर करण्यात येणार आहे. यापूर्वी दहावी आणि बारावीचा निकाल जून महिन्यात जाहीर होत असे. दहावी आणि बारावीचा निकाल लवकर जाहीर झाल्यानं पुढील प्रवेश प्रक्रिया आणि शैक्षणिक वर्षाची वेळेत सुरुवात होण्यास मदत होणार आहे. दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता अकरावीची प्रवेश प्रक्रिया सुरु होईल.


# भारत विश्वगुरू होण्यासाठी प्रशासनातील अधिकाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे – 'यशदा'चे प्रभाकर वर्तक

मुंबई (दै. संध्या)

मुंबई, दि. ७ : भारताला विश्वगुरू बनवण्यासाठी केवळ आर्थिक प्रगती नव्हे तर नैतिक, शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सामाजिक प्रगती आवश्यक आहे. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रशासनातील अधिकारी हे राष्ट्रनिर्मितीचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत, अशा अधिकाऱ्यांचे योगदान महत्वाचे असल्याचे प्रतिपादन यशदाचे प्रशिक्षक प्रभाकर वर्तक यांनी केले.

मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने आयोजित 'टेक वारी 2.0-महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताह' अंतर्गत 'इथिक्स इन गर्व्हनन्स' या विषयावर वर्तक बोलत होते. यावेळी सहसचिव बडगेरी यांच्यासह मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

वर्तक यांनी सांगितले की, समाजात प्रेम, बंधुता, नैतिकता, विश्वकल्याणाला फार महत्व आहे. याचा समाजामध्ये, प्रशासनात योग्य वापर केला तर समाजाचे कल्याण होते. मागील वर्षी भारत देश विश्वगुरू होण्याच्या वाटेवर होता. यासाठी प्रशासनात सक्षम, प्रामाणिक आणि दूरदृष्टी असलेले अधिकाऱ्यांचे योगदान देशाच्या विकासाला गती देतात. पायाभूत सुविधा, आर्थिक विकासामध्ये महाराष्ट्र राज्य देशातील सर्वोत्तम राज्य याच अधिकाऱ्यांच्या प्रामाणिक आणि नैतिक कामामुळे झाले आहे. प्रशासनात




पारदर्शक आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाला खूप महत्व आहे. भ्रष्टाचार हा विकासातील अडथळा असून अधिकारी, कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम केल्यास जनतेचा शासनावर विश्वास वाढतो आणि विकास कामांना गती मिळते. दुर्बल घटकांना न्याय मिळवून देणे व सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे हे अधिकाऱ्यांचे मोठे कर्तव्य आहे. कायद्याच्या चौकटीत राहून सामाजिक भावनेतून पिडीत, शोषितांना लाभ पोहोचविण्याचे कर्तव्य अधिकाऱ्यांनी पार पाडण्याचे आवाहन त्यांनी केले. सामाजिक न्याय आणि समानतेचा वापर करा, दुसऱ्याची सुश्रुषा करा या बुद्धांच्या तत्वाची सद्यस्थितीत आवश्यकता आहे. अंतर्मनाचा आवाज ऐकून मनावर ताबा मिळवा. धर्म आणि निती याबाबत विविध धर्मात चांगली शिकवण दिली आहे. संतांचे विचार, आचरण या माध्यमातून समाजात वागण्याबाबतची माहिती त्यांनी दिली.

# संपादकीय

# 'डार्क स्काय'- शहरी गोंगाटापासून दूर, आकाशाच्या कुशीत...

'भूमीवरी पडावे, ताऱ्यांकडे पाहावे, प्रभूनाम नित्य गावे, या झोपडीत माझ्या..' असे सांगून संत तुकडोजी महाराजांनी खुल्या आकाशातील ताऱ्यांकडे पाहत देवाचे नामस्मरण करणे, यातच खऱ्या आनंदाची आणि शांतीची अनुभूती असल्याचा संदेश दिला आहे. मात्र, शहरांच्या चकचकीत उजेडात, उंच इमारतींच्या सावल्यांत आणि कृत्रिम प्रकाशाच्या अतिरेकात ताऱ्यांचा निखळ, निरागस उजेड कुठेतरी हरवून गेला आहे. अशावेळी राज्य सरकारने आता महाराष्ट्रातील गडद आकाश अर्थात 'डार्क स्काय' असलेल्या ११ ठिकाणी 'आंतरराष्ट्रीय डार्क स्काय पर्यटन सर्किट्स' उभारण्याचे ठरवले आहे. महाराष्ट्र पर्यटन धोरण २०२४ अंतर्गत खगोल-पर्यटन व डार्क स्काय संवर्धनासाठी उप-धोरण तयार करण्याच्या निर्णयाला राज्य सरकारने गती देऊन ११ संभाव्य स्थळांची निवड करत प्रकल्प अहवाल तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. हा निर्णय केवळ पर्यटनवाढीचा कार्यक्रम नाही; तो निसर्गाशी पुन्हा संवाद साधण्याचा प्रयत्न आहे. हे धोरण 'विकसित महाराष्ट्र २०४७ मधील पर्यटन विकास आराखड्या'शी सुसंगत असून, २०४७ पर्यंत राज्याला ३.५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्यासाठी पर्यटन क्षेत्रात लाखो रोजगार निर्माण करण्याची आणि राज्याच्या जीडीपीमध्ये भरीव योगदान देण्याची क्षमता लक्षात घेऊन डार्क स्काय पर्यटनाचा विचार पुढे आला आहे.

यामुळे महाराष्ट्र आता केवळ ऐतिहासिक आणि नैसर्गिक पर्यटनापुरता मर्यादित न राहता ताऱ्यांच्या मोहक दुनियेत घेऊन जाणाऱ्या पर्यटनासाठीही सज्ज होणार आहे. यामुळे खगोलप्रेमी आणि ॲस्ट्रोफोटोग्राफर्ससाठी महाराष्ट्र नवा हॉटस्पॉट ठरणार आहे. या उपक्रमामुळे 'अनुभवाधारित पर्यटनाला' मोठी चालना मिळणार असून, पर्यटकांना शहरांच्या गोंगाटापासून दूर जाऊन निर्मळ, तारकांनी भरलेले आकाश अनुभवण्याची संधी मिळणार आहे. 'डार्क स्काय टुरिझम' ही फक्त नवलाई नसून, प्रकाशाच्या अतिरेकातून बाहेर पडून अंधाराच्या सौंदर्याला स्वीकारण्याची एक नवी अनुभूती ठरणार आहे. महाराष्ट्रातील ताडोबा, मेळघाट, भीमाशंकर, लोणार यांसारखी ठिकाणे आधीच जैवविविधतेसाठी ओळखली जातात. तेथील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे स्वच्छ, प्रदूषणमुक्त आकाश आता पर्यटनाच्या केंद्रस्थानी येऊ पाहतो आहे. राज्य सरकारने पहिल्या टप्प्यात ११ ठिकाणांची निवड केली आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प (चंद्रपूर), लोणार सरोवर (बुलढाणा), पेंच व्याघ्र प्रकल्प (नागपूर), उदमाळ (नाशिक), भंडारदरा धरण (अहिल्यानगर), हरिहरेश्वर (रायगड), तोरणमाळ (नंदुरबार), यावल पूर्व रांग (जळगाव), मेळघाट (अमरावती), भीमाशंकर (पुणे), आसनगावचा माहुली गड (ठाणे) यांचा यात समावेश आहे. या उपक्रमातून स्थानिकांना रोजगार, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना आणि पर्यटकांना वेगळ्या निसर्गाची अनुभूती हे सर्व लाभ अपेक्षित आहेत.या दृष्टीने पाहिले, तर ही संकल्पना खरोखरच संधींचे नवे आकाश उघडणारी आहे.

परंतु, या चमकदार कल्पनेच्या पाठीमागे काही प्रश्नही तितकेच ठळकपणे उभे राहतात. 'डार्क स्काय' जपण्यासाठी आवश्यक असलेले कठोर नियम आपण कितपत पाळू शकू? प्रकाशप्रदूषण कमी करण्यासाठी रस्त्यांवरील दिव्यांची रचना बदलावी लागेल, अनावश्यक उजेडावर नियंत्रण ठेवावे लागेल. हे करताना स्थानिकांच्या सुरक्षेचा आणि जीवनशैलीचा समतोल राखणे अत्यावश्यक आहे. याहून मोठा प्रश्न म्हणजे, पर्यटनाचा वाढता ताण. आजवर अनेक पर्यटनस्थळांनी अनुभवले आहे की, पर्यटकांच्या ओघातच निसर्गाचा ऱ्हास होतो. जंगलतोड, विकासकामांसाठी डोंगर पोखरणे, कचऱ्याचे ढीग, ध्वनिप्रदूषण, अनियंत्रित बांधकामे, पर्यटकांत होणारे भांडणे-तंटे ही वास्तवता 'डार्क स्काय'च्या मूळ तत्त्वालाच हरताळ फासू शकते.

## गुरु वचन

### समान भावाने सेवा

एका वेळची गोष्ट आहे. ईश्वरचंद विद्यासागर यांच्याजवळ त्यांच्या मित्राचा एक नोकर काही कामानिमित्त आला. विद्यासागर बाहेर आले आणि त्यांनी पाहिले तर घराच्या खाली एक वयस्कर व्यक्ती उभा होता. आणि तो खूप थकलेला होता. अशा स्थितीत तो वरती येण्यास असमर्थ होता. हे पाहून विद्यासागर त्या व्यक्तीसाठी पिण्यास पाणी घेऊन आले आणि परत जाऊन पंखा घेऊन आले आणि स्वत: हवा मारु लागले. विद्यासागरना असे करताना पाहून त्यांचा मित्र म्हणाला ज्या व्यक्तीस आपण पाणी पाजत आहात आणि पंख्याने हवा मारत आहात तो एक सामान्य सेवक आहे. मित्राचे हे बोलणे ऐकून विद्यासागर म्हणाले ठीक आहे, हा एक सेवक आहे, परंतु माणूसच आहे.

यावरुन विद्यासागर यांनी मित्राला आपल्या लहानपणीची एक गोष्ट सांगितली, माझे वडील एकदा बाजारात चक्कर येऊन पडले. तेथे चन्ना विकणाऱ्या एका व्यक्तीने आपले काम सोडून ताबडतोब पाणी आणले आणि त्याचा शिडकावा मारला आणि नंतर पंखा आणून त्याने हवाही मारु लागला, असे करत असताना तो आपले सामानही विसरुन गेला. त्याला केवळ माझ्या वडिलांची चिंता होती. थोड्याच वेळात जेव्हा माझे वडील उठून बसले. तेव्हा त्यांनी त्या व्यक्तीचे आभार मानले. या घटनेमुळे मी एवढा प्रभावित झालो की, त्यानंतर कोणत्याही व्यक्तीची मदत करणे आपला धर्म मानला. शेवटी म इझ्यासाठी ही गोष्ट कोणतेच बंधन ठेवत नाही की, कोणी व्यक्ती उच्च जातीचा आहे की, खालच्या जातीचा आहे. छोटा असो व मोठा मी सर्वांना समान समजतो. आणि त्यांची समान भावानेच सेवा करतो.

## उपदेशकथा


### मातृभक्ती

त्या काळात सर आशुतोष मुखर्जी कलकत्ता विद्यापीठाचे उपकुलपती तर होते शिवाय कलकत्त्याच्या उच्च न्यायालयात न्यायाधिशही होते. त्यांचा साधेपणा, हुशारी, रोखठोकपणा व आदर्श व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन इंग्रज सरकारने त्यांना इंग्लंडला पाठवण्याचे ठरवले. त्यानुसार परदेशी जाण्याची सर्व तयारी त्यांनी केली पण शेवटच्या क्षणी त्यांच्या आईने काही कारणांमुळे त्यांना इंग्लंडला न जाण्यास सांगितले. आईची आज्ञा शिरसावंद्य मानून एवढ्या चांगल्या संधीकडे त्यांनी पाठ फिरवली व सरकारला कळविले की, माझ्या आईला मी परदेशी जावे, असे वाटत नाही. त्यामुळे मला माझा प्रवास नाईलाजाने रद्द करावा लागत आहे. त्यावेळचा व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन हे पत्र पाहून अतिशय संतापला व म्हणाला, एका सामान्य भारतीयाची सरकारचा आदेश डावलण्याची हिंमत कशी झाली ? त्याने सर आशुतोष मुखर्जी यांना बोलावले व म्हणाला, जा, आपल्या आईला जाऊन सांगा की भारताचा व्हाईसरॉय तुमच्या मुलाला परदेशी जाण्याची आज्ञा देत आहे. त्यावेळी व्हाईसरॉयची आज्ञा न मानणे म्हणजे स्वत:वर संकट ओढवून घेण्यासारखे होते, पण आईच्या आज्ञेपुढे त्यांना कर्झनच्या आज्ञेची किंमत शून्य होती. ते आपल्या निश्चयापासून जराही विचलीत झाले नाहीत व गंभीर चेहऱ्याने व धाडसाने म्हणाले, महाशय, मी माझ्या आईच्या आज्ञेचे उल्लंघन करु शकत नाही. जगात आईच्या आज्ञेशिवाय कोणाचीही आज्ञा श्रेष्ठ मानत नाही. आमची परंपरा व संस्कृती आईला देवता म्हणून मानते व अशा देवीची आज्ञा माझ्या जीवात जीव असेपर्यंत मी मोडू शकत नाही. तेव्हा यासंबंधी कृपया आपण मला अधिक काहीही सांगू नका ! हा विषय माझ्या दृष्टीने संपला आहे. त्यांची मातृभक्ती पाहून कर्झन आश्चर्यचकित झाला व त्यांना प्रेमाने आलिंगन दिले.

## पंचांग

पंचांग
८ मे २०२६
शुक्रवार
विक्रम संवत्- २०८२
वैशाख शके
संवत्- १९४८
संवत्सर -पराभवनाम
अयन- उत्तरायणारंभ
मास- वैशाख
ऋतु- सौर ग्रीष्म
कृष्ण पक्ष
तिथि:षष्टी १२:२१:५८
नक्षत्र:उत्तराषाढा
२१:१९:४१
योग:शुभ २६:२९:३३+
करण:वणिज १२:२१:५८
करण:विष्टि २५:१६:३४+

सूर्य:मेष
चन्द्र:मकर०१:२६:११
हिजरी सन् - १४४६
मुस्लिम मास - जिल्काद
तारीख - २१
विशेष



रवींद्रनाथ टागोर जयंती
जागतिक रेडक्रॉस दिन

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९४२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | | 9 | | | | 6 | 7 |
| 2 | 1 | 9 | | | | | | |
| | | | 8 | | | | | 1 |
| 9 | 2 | 1 | | 8 | 6 | | | |
| 5 | | | | 9 | | | | 8 |
| | | | 1 | 5 | | 2 | 7 | 9 |
| 6 | | | | | 3 | | | |
| | | | | | | 1 | 9 | 2 |
| 1 | 7 | | | | 9 | | 5 | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९४१ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7 | 3 | 9 | 2 | 6 | 4 | 5 | 8 |
| 9 | 2 | 8 | 4 | 7 | 5 | 3 | 6 | 1 |
| 5 | 4 | 6 | 3 | 1 | 8 | 7 | 2 | 9 |
| 8 | 9 | 1 | 2 | 6 | 7 | 5 | 4 | 3 |
| 7 | 6 | 4 | 5 | 3 | 9 | 8 | 1 | 2 |
| 3 | 5 | 2 | 8 | 4 | 1 | 6 | 9 | 7 |
| 2 | 3 | 9 | 6 | 8 | 4 | 1 | 7 | 5 |
| 4 | 8 | 7 | 1 | 5 | 2 | 9 | 3 | 6 |
| 6 | 1 | 5 | 7 | 9 | 3 | 2 | 8 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८४६ – मेक्सिकन–अमेरिकन युद्ध–पॅलो आल्टोची लढाई.
- १८६१ – अमेरिकन गृहयुद्ध – दक्षिणेने रिचमंड, व्हर्जिनिया आपली राजधानी असल्याचे जाहीर केले.

### राष्ट्रीय

- १८९९ – रँड वधाच्या प्रकरणी फितुरी करणाऱ्या द्रविड बंधूंना ठार मारणाऱ्या वासुदेव चाफेकर यांना फाशी.
- १९३३ – महात्मा गांधींचे २१–दिवसांचे उपोषण चालू.
- २००६ – गाजियाबादमध्ये पोलाद कारखान्यात ५० क्षेपणास्त्रे सापडली.
- २००८ – जम्मू–काश्मीरच्या किश्तवाडजवळ एक बस चिनाब नदीत कोसळून ४० जण ठार झाले.

### जन्म

- १७५३ – मिगेल हिदाल्गो, मेक्सिकोचा स्वातंत्र्यसैनिकाचा जन्म.
- १८२८ – ज्याँ हेन्री ड्युनांट, रेड क्रॉसचा संस्थापकाचा जन्म.
- १८८४ – हॅरी टुमन, अमेरिकेचा राष्ट्राध्यक्षाचा जन्म.
- १९१६ – स्वामी चिन्मयानंद, भारतीय तत्त्वज्ञानीचा जन्म.

### निधन

- ५३५ – पोप जॉन दुसरा यांचे निधन.
- १२७८ – दुआनझाँग, चीनी सम्राटाचे निधन.
- १३१९ – हाकोन पाचवा, नॉर्वेचा राजाचे निधन.
- १७७३ – अली बे अल–कबीर, इजिप्तचा सुलतानचे निधन.
- १८१९ – कामेहामेहा, हवाईचा राजाचे निधन.
- १९८२ – आत्माराम रावजी देशपांडे उर्फ कवि अनिल, मराठी कवीचे निधन.

प्रतिवार्षीक पालन
जागतिक रेडक्रॉस दिन.
युरोप विजय दिन.

## : SMS :

Now bush says:
Ek ajab sa Manzar
nazar aata hai
Ek shaks ka bhi
hajoom nazar
aata hai
Kahan ja kar karun
Press Conference
Her ek ke haath
mein Joota
nazar aata hai.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३५.५ | २६ |
| अहमदनगर | ३५.४ | २४.४ |
| अकोला | ३९.८ | २८.८ |
| अमरावती | ३८ | २९.३ |
| बीड | ४१.८ | २९.९ |
| भंडारा | ४०.८ | २८.९ |
| बुलढाणा | ३३.८ | २०.५ |
| चंद्रपूर | ४१.९ | २९.४ |
| चेन्नई | ४०.९ | ३२.२ |
| नवी दिल्ली | ३३.६ | २४.८ |
| धुळे | ३८.९ | २५.६ |
| गोंदिया | ३८.९ | २८.२ |
| जळगाव | ३९ | २८.६ |
| कोल्हापूर | ३६.२ | २०.९ |
| लातूर | ३६.४ | २७.७ |
| मुंबई | ३७.७ | ३०.४ |
| नागपूर | ४० | २८.२ |
| नांदेड | ३९.३ | २८.९ |
| नंदूरबार | ३८.२ | २६.३ |
| नाशिक | ३६.१ | २१.९ |
| पुणे | ३४.४ | २१.९ |
| पंढरपूर | ३८.२ | २६.२ |
| सातारा | ३६.२ | १९.९ |
| सांगली | ३७.७ | २१.८ |
| सोलापूर | ३९.१ | २८.१ |
| वर्धा | ४०.९ | २९.७ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा: उत्तर सामाजिक कार्यात प्रशंसा होईल. खर्च होण्याची शक्यता आहे.

**तूळ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा: पश्चिम आर्थिक गणितं सुधारतील आणि व्यापारात फायदा होण्याचे योग येतील.

**वृषभ :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा: पश्चिम व्यापारात, नोकरीत संपत्ति प्राप्त होईल. मुल झाल्याने आनंद होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा: उत्तर उद्योगधंद्यात अपेक्षेप्रमाणे बदल घडतील. प्रवास आरामदायक होईल.

**मिथून :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा: दक्षिण कुटूंबातील विविध मुद्यांवर विचार–विनिमयात विरोध राहील.

**धनू :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा: दक्षिण समजदारीने निर्णय घेणे आवश्यक आहे. व्यापार आणि संपत्ती विषयी कामे टाळणे शुभ राहील.

**कर्क :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा: उत्तर भागिदारीत प्रगतीचे योग. संपत्तीत वाढ होईल. पैसे वसूल होण्याची शक्यता आहे.

**मकर :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा: दक्षिण मित्र तसेच भावांच्या मदतीने व्यापारीक वाद सोडवू शकाल. कामे वेळेवर पूर्ण होतील.


**सिंह :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा: पश्चिम, व्यक्तिगत तसेच प्रणय संबंधात सुधारणा होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा: उत्तर मोठ्यांशी वागतांनी संयम ठेवणे आवश्यक आहे. वैवाहिक कार्यक्रमांचे वातावरण राहील.

**कन्या :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा: उत्तर सहचारिणीच्या प्रगतीने सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. व्यापार–उद्योग चांगला चालेल.

**मीन :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा: उत्तर अधिका–यांमध्ये आपले वर्चस्व वाढेल. व्यापारासंबंधी केलेल्या तडजोडी फायद्याच्या राहतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९४२



**आडवे शब्द**

१. सन्मानपूर्वक पाठवणी
३. अनावर, बेबंद
५. बत्तीस शिराळ्याचा खास पाहुणा!
७. धमकी
१०. जमाखर्च
११. शेतातील हत्यार
१३. सकस
१५. दार
१७. लोणी
१८. दारूचा प्रकार
१९. नेहमी (हिंदी)
२०. लाकडाची एक उत्कृष्ट जात
२०अ. जून, जरड
२१. खालच्या दर्जाचा
२३. मध्यम प्रमाण
२५. गाईचे पिल्लू
२८. हत्ती
२९. मनाचे ोक लिहिणारे संत
३१. जाणकार
३२. मला
३३. स्तुती
३५. आश्चर्य
३७. यथावकाश, कालक्रमानुसार
३९. परिचय
४१. जारण–म ारणवादी प्रयोग
४३. किंमतीतील वृद्धी
४५. झाडाची कोवळी फांदी
४७. समशीततोष्ण
४८. पंख
५०. फरक, तफावत
५२. पासपोर्टला मराठी शब्द
५३. घागर
५४. एक रंगीत कंदमूळ
५५. वायु, त्रास
५६. किल्ल्याभोवतीची जाडजूड भिंत
५७. कार्य, काम
५९. मुसलमानांचा उपवासाचा महिना
६१. तुर्रेदार फळ
६३. पुन्हा
६४. बारा वर्षांचा काळ
६६. जाडसर पीठ
६७. कुंतीपुत्र
६८. अपमान
७०. आकाशातून पडणारे हिमकण
७२. शेतकरी
७४. आशीर्वाद
७५. शेंडीवाले फळ
७६. सुकाळ, वैभव
७७. तीव्र वास
७८. वाचा

**उभे शब्द**

१. समुद्र
२. लोकमान्यांचा गीतेवरील टीकाग्रंथ
३. अराजक
४. ख्रिश्चन धर्मप्रसारक
५. होडी
६. गणपती
८. सहाय्यक
९. समीक्षक
११. गबाळा, अव्यवस्थित
१२. आवाज, गोंगाट
१४. एकरुप
१६. पातळ खांब
२०ब. तशी ठीकच!
२२. शहर
२३. नेहमी
२४. गाढव
२५. विष्णुचा बुटका अवतार
२६. खिशातील चौकोनी वस्त्र
२७. ओढाताण
२९. उघडपणे
३०. क्षणजीवी
३२. माजलेला
३४. तमाशातील शृंगारिक गीत
३६. 'लक्ष्मी ---, दीनानाथा, पद्मनाभा' (संत तुकारामांनी केलेला विष्णुचा धावा)
३८. दागदागिने
४०. अवघड, कष्टप्रद
४२. पाणी उकळतानाचा आवाज
४४. वेळ पाळणारा, वेळेप्रमाणे वागणारा
४६. पराभव
४८. बातमीदार
४९. एक पालेभाजी
५०. काजळ, सुरमा इ.प्रकार
५१. पगार
५४. गवगवा
५५. व्रताच्या उद्यापनाच्या वेळी द्यायच्या वस्तू इ.
५८. मतगणना
६०. करपलेला भाग
६१. सुपारी कातरण्याचे साधन
६२. पूर्ण भरती
६३. नासक्या दुधाच्या वड्या
६५. ठराविक आणि नियमित मोबदला
६९. खा खा खाणारा
७१. एक ज्वालाग्राही पदार्थ
७३. आभाळ, आकाश

उत्तर उद्याच्या अंकात

**जम्बो शब्दकोडे क्र. ९४१ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.असंभव ४.राजवाडा ८.आसपास ११.काळजी १३.करगोटा १५.कयास १७.वळवळ १८.पकडणे २०.पान २१.मनन २३.सम २४.विनायक २७.वातड २९.सुमन ३०.रसना ३१.गीतकार ३४.लहानसहान ३७.आम ३९.मालामाल ४२.खाट ४३.नजर ४४.मस्त ४५.जनता ४६.राजीव ४८.गाढव ४९.वाकळ ५१.तोरा ५२.सतत ५३.रीता ५५.रात ५६.सांज ५८.गेह ६०.ठाव ६२.नवरात्र ६४.रसदार ६६.वाफ ६८.गण ६९.स्तवन ७१.रजई ७२.दादर ७३.साम ७५.सारवान ७७.मनोहर ७८.सामनावीर ७९.हालचाल ८१.तण ८२.घसा ८३.सहनशील ८४.कमळ

उभे उत्तर : १.अनेक २.भकास ३.वळ ५.जनावर ६.डाक ७.संगोपन ९.सरणे १०.सहगमन १२.जीवन १४.टाक १६.यातना १९.डबी २०.पाक २१.मत २२.नडगी २३.समसमान २४.विशाल २५.यवन २६.बेसन २८.धोका ३०.रहाटगाडगे ३२.तळमळ ३३.रमा ३५.हारजीत ३६.सखा ३७.आज ३८.मरवा ४०.लाजरा ४१.लता ४३.नवरी ४६.रासगरबा ४७.वतनदार ५०.कळी ५१.तोतरा ५४.ताठा ५५.रावण ५७.जननमरण ५९.हवा ६१.वस्त्रदान ६२.नगरपाल ६३.त्रस्त ६५.रजनीनाथ ६७.फरार ७०.वसाहत ७४.उसासा ७५.सारस ७६.वाचन ७७.मलम ७९.हाल ८०.चाक

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### 'प्रधानमंत्री सूर्यघर' योजनेच्या प्रसारासाठी महावितरणचा पुढाकार

पुणे (दैनिक संध्या) : केंद्र सरकारची अत्यंत महत्त्वाकांक्षी 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना' घराघरांत पोहोचवण्यासाठी महावितरणच्या पुणे परिमंडलाने कंबर कसली आहे. शुक्रवारी रास्ता पेठ शहर मंडल, गणेशखिंड शहर मंडल आणि पुणे ग्रामीण मंडलातील सर्व उपविभाग व शाखा कार्यालयांतर्गत महावितरणचे वीज कर्मचारी थेट गृहनिर्माण संस्थांमध्ये जाऊन या योजनेचा प्रसार करणार आहेत. पुणे परिमंडलात आतापर्यंत ३४३१२ ग्राहकांनी सूर्यघर योजनेचा लाभ घेतला आहे. त्याची क्षमता १७० मेगावॉट इतकी असून सूर्यघर योजनेमुळे या ग्राहकांचे वीजबिल शून्यवत झाले आहे. केंद्र सरकार सूर्यघर योजनेसाठी १ किलोवॅट प्रकल्पाला ३०,००० रुपये, २ किलोवॅट प्रकल्पासाठी ६०,००० रुपये तर ३ किलोवॅट किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेसाठी कमाल ७८,००० रुपये इतके अनुदान देत आहे. एका किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पातून दरमहा सरासरी १२० युनिट वीज तयार होते. सूर्यघर प्रकल्पासाठी राष्ट्रीयकृत बँकांकडून ९० टक्क्यांपर्यंत कर्ज सुद्धा मिळते.

प्रधानमंत्री-सूर्यघर योजनेला वीजग्राहकांपर्यत पोहोचविण्यासाठी वीज कर्मचारी गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये जाऊन माहिती पत्रके वाटतील आणि ग्राहकांना मिळणाऱ्या भरघोस अनुदानाची माहिती देऊन योजनेत सहभागी होण्याचे आवाहन करतील.

**- सुनिल काकडे, मुख्य अभियंता, महावितरण, पुणे**

### शासकीय निवासी शाळेत मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याचे आवाहन

पुणे (दैनिक संध्या) : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत कार्यान्वित असलेल्या पुणे जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची/मुलींच्या शासकीय निवासी शाळेत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असून जास्तीत जास्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी या शाळांमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी केले आहे. सन 2026-27 या शैक्षणिक वर्षात अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांसाठी असलेल्या दिवे (ता. पुरंदर), तरंगवाडी (ता. इंदापूर), पेठ (ता. आंबेगाव) तसेच मुलींसाठी चांडोली (ता. खेड) या ठिकाणी निवासी शाळेत इयत्ता 6 वी ते 10 पर्यंत प्रवेश देण्यात येणार आहे. या निवासी शाळेत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी 80 टक्के, अनुसूचित जमातीसाठी 10 टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी 5 टक्के, विशेष मागास प्रवर्गासाठी 2 टक्के तर दिव्यांगासाठी 3 टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत, असेही श्री.लोंढे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

### डॉक्टर अटकेत; मुलीच्या गर्भपात प्रकरणातून मोठं रॅकेट उघड होणार?

पुणे (दैनिक संध्या) : बारामती तालुक्यातील १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात बेकायदेशीर गर्भपात केल्याच्या आरोपावरून फलटण येथील डॉ. योगेश नरुटे याला वडगाव निंबाळकर पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईनंतर फलटण परिसरात बेकायदेशीर गर्भपाताचे रॅकेट कार्यरत असल्याचा संशय व्यक्त होत असून, प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वडगाव निंबाळकर परिसरातील अल्पवयीन मुलीवर काही दिवसांपूर्वी अत्याचार झाल्यानंतर ती गर्भवती असल्याचे समोर आले. त्यानंतर तिला उपचाराच्या नावाखाली फलटण येथील डॉ. नरुटे यांच्या खासगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, गर्भपात करताना आवश्यक वैद्यकीय नियम, शासकीय परवानगी आणि बालसंरक्षणाशी संबंधित कायद्यांचे पालन न केल्याचा आरोप डॉक्टरवर ठेवण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच वडगाव निंबाळकर पोलिसांनी तपास सुरू केला. प्राथमिक चौकशीत संशय बळावल्याने पोलिसांनी डॉक्टरला ताब्यात घेत अटक केली. सहायक पोलिस निरीक्षक नागनाथ पाटील यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (दि. ६) फलटण येथील संबंधित रुग्णालयात झाडाझडती घेण्यात आली. या वेळी महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, या प्रकरणातून फलटण परिसरात बेकायदेशीर गर्भपाताचे मोठे रॅकेट कार्यरत असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या रॅकेटमध्ये दलाल, मध्यस्थ तसेच इतर वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तींचा सहभाग असू शकतो, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. पोलिसांकडून रुग्णालयातील उपचार नोंदी, वैद्यकीय कागदपत्रे आणि गर्भपात प्रक्रियेची माहिती तपासली जात आहे. तसेच पीडित मुलीला फलटणपर्यंत कोणी नेले, डॉक्टरशी संपर्क कसा साधला गेला, याबाबतही चौकशी सुरू आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपीचा शोधही पोलिसांकडून सुरू असून, आणखी काही आरोपी निष्पन्न होण्याची शक्यता आहे. पुढील काळात अटकसत्र वाढण्याची चिन्हे आहेत. या घटनेमुळे बारामती व फलटण परिसरांत संतापाची लाट उसळली असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक नागनाथ पाटील व त्यांच्या पथकाकडून सुरू आहे.

### मुलगी परत द्या..! म्हणत रस्त्यातच उचललं; वडिलांसह नातेवाईकांनीच केलं अपहरण



पुणे (दैनिक संध्या) : आंबेगाव तालुक्यातील पारगाव परिसरात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, विवाहित मुलीचे तिच्याच वडिलांनी साथीदारांच्या मदतीने अपहरण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पारगाव कारखाना पोलिसांनी तातडीने कारवाई करीत अवघ्या चार तासांत सात आरोपींना अटक करून उल्लेखनीय कामगिरी बजावली. ही घटना ४ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजेच्या सुमारास घडली. साक्षी विशाल भागवत (रा. पारगाव, लबडे मळा, ता. आंबेगाव, जि. पुणे) या त्यांच्या सासरच्या व्यक्तीसोबत असताना, त्यांच्या वडिलांसह अन्य सहा जणांनी त्यांना अडवले. आरोपींनी मारहाण, शिवीगाळ व दमदाटी करीत जबरदस्तीने वाहनात टाकून त्यांचे अपहरण केले. प्राथमिक तपासात या अपहरणामागील उद्देश पीडितेचे जबरदस्तीने दुसरे लग्न लावून देण्याचा असल्याचे समोर आले आहे. घटनेची माहिती मिळताच पारगाव कारखाना पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने तात्काळ हालचाल सुरू केली. विविध ठिकाणी शोधमोहीम राबवत पोलिसांनी अवघ्या चार तासांत सर्व आरोपींना अटक करण्यात यश मिळवले. याप्रकरणी शिवाजी भाऊ खाटेकर (वय ४५, रा. पारगाव, ता. आंबेगाव), अमोल चांगदेव रोडे (वय ३३), सचिन रावसाहेब रोडे (वय २९), अक्षय विश्वनाथ वाडगे (वय २९), अभिजीत बारकू रोडे (वय २६), नंदकिशोर विलास तितर (वय ३२, सर्व रा. नांदूर खंदरमाळ, ता. संगमनेर, जि. अहमदनगर) तसेच जयश्री अशोक कुदनर (वय ३५, रा. साकोर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) यांना अटक करण्यात आली असून, त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलिस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पथकात सहायक पोलिस निरीक्षक सचिन कांडगे, पोलिस उपनिरीक्षक भाऊसाहेब लोकरे, पोलिस हवालदार अविनाश कालेकर, सचिन डामसे तसेच पोलिस कर्मचारी संजय साळवे, मंगेश अंभग, चंद्रकांत गव्हाणे, प्रशांत जगताप आणि महिला पोलिस अंमलदार काजल फलके यांचा सहभाग होता.

# आरोग्यसेवा आणि जनजागृती मोहिमांमध्ये पुढाकार घ्यावा

**वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ**



**पुणे (दै. संध्या)**

महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत तोंडाच्या शस्त्रक्रियेशी संबंधित दंत उपचारांचा समावेश करण्यात आलेला आहे; सुलभ मौखिक आरोग्यसेवेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. तोंडाचा कर्करोग, दातांमध्ये कीड आणि हिरड्यांचे आजार यांसारखी आव्हाने उभी आहेत, वैद्यकीय संस्थानी विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार, गुणवत्तापूर्ण, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासोबतच जनजागृती मोहिमांमध्ये पुढाकार घेतला पाहिजे, असे प्रतिपादन राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले.

एम. ए. रंगूनवाला कॉलेज ऑफ डेंटल सायन्सेस अँड रिसर्च सेंटरच्यावतीने आझम कॅम्पस येथे आयोजित 20 व्या पदवीदान समारंभात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. रमणदीप दुगल, उपप्राचार्य (प्रशासन) डॉ. सलीका शेख, उपप्राचार्य (शैक्षणिक) डॉ. विवेक हेगडे, सचिव प्रा. इरफान शेख तसेच प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

श्री. मुश्रीफ म्हणाले, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या (एमयूएचएस) ‘सेंटर्स ऑफ एक्सलन्स’, आंतरवासिता कार्यक्रम आणि जागतिक सहकार्य उपक्रमांद्वारे आरोग्य शिक्षणाचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी महाराष्ट्र शासन काम करीत आहे. डिजिटल साधने, कृत्रिम बुद्धिमत्ता सिम्युलेशन-आधारित शिक्षण आणि कमीत कमी हस्तक्षेप करणाऱ्या उपचार पद्धतींमुळे दंतवैद्यक क्षेत्र झपाट्याने विकसित होत आहे. विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी नवकल्पना, संशोधन आणि स्वदेशी विकासावर लक्ष केंद्रित करावे, जेणेकरून आरोग्य शिक्षणाला सेवेमध्ये त्याचा खरा अर्थ प्राप्त होईल. भारताकडे केवळ तंत्रज्ञान वापरण्याचीच नव्हे, तर ते निर्माण करण्याचीही क्षमता आहे. ही बाब विचारात घेता महाराष्ट्र शासन आरोग्य शिक्षण अधिक सक्षम करण्यासाठी कटिबद्ध आहे.

ते पुढे म्हणाले, एम. ए. रंगूनवाला कॉलेज ऑफ डेंटल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर या प्रतिष्ठित संस्थेचा 25 वर्षांचा प्रवास हा केवळ कालावधीचा टप्पा नसून, तो दूरदृष्टी, शिस्त आणि सातत्यपूर्ण उत्कृष्टतेचे प्रतीक आहे.

डॉ. पी. ए. इनामदार यांच्या दूरदृष्टी आणि समर्पणामुळे या संस्थेची यशस्वी वाटचाल सुरू असून हजारो विद्यार्थी आणि कुटुंबांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम घडवला आहे. अशा संस्था केवळ पायाभूत सुविधांवर उभ्या राहत नाहीत, तर त्यामागे त्याग, मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी असते. शिक्षण आणि राष्ट्रनिर्मिती क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा समाजाला खरोखरच मोठा लाभ झाला आहे.

या प्रतिष्ठित संस्थेने शैक्षणिक आणि वैद्यकीय उत्कृष्टतेचे केंद्र म्हणून मोठी प्रगती साधली आहे. आजपर्यंत 1 हजार 382 दंत पदवीधर आणि 505 पदव्युत्तर विद्यार्थी घडविले असून, जागतिक स्तरावर माजी विद्यार्थ्यांचे जाळे निर्माण केले आहे.

या संस्थेने व्हिएन्ना विद्यापीठ, किंग्स कॉलेज लंडन, जे. मोरिटा जपान, एंडोस्टार पोलंड आणि एमआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांसारख्या नामांकित संस्था आणि विद्यापीठांशी सामंजस्य करार केले आहेत. युनिव्हर्सिटी ऑफ झ्युरिक, बर्ग, कझाकस्तान, मराठा मंडळ नाथाजीराव जी. हळगेकर इन्स्टिट्यूट ऑफ डेंटल सायन्स अँड रिसर्च सेंटर, बेळगावी, डॉ. डी. वाय. पाटील डेंटल कॉलेज, पुणे, येनेपोया विद्यापीठ, मंगळुरू, ईसीओ अकॅडमी, कोलकाता अशा संस्थांसोबतच्या सहकार्यामुळे या संस्थेचे शैक्षणिक जाळे अधिक बळकट झाले आहे. ही संस्था सेवा, शिक्षण आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांवर उभी आहे. आजच्या जगात अशा भागीदाऱ्या सुसंगत आणि स्पर्धात्मक राहण्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत.

यापुढे पदवीसोबत तुमच्यावर एक मोठी जबाबदारीही आली आहे. कौशल्य तुम्हाला यशस्वी बनवेल, नैतिकता तुम्हाला आदर मिळवून देईल आणि करुणा तुम्हाला कायम स्मरणात ठेवेल, नवकल्पना, सहकार्य आणि मानवतेच्या सेवेमुळे आपले भवितव्य आणखी प्रभावी आणि प्रेरणादायी ठरेल. ही बाब विचारात घेऊन काम करावे. संस्थेनेही कुशल दंतवैद्यच नव्हे, तर समाजासाठी संवेदनशील आणि सेवाभावी आरोग्यसेवक घडवावे, अशा शुभेच्छा मंत्री श्री. मुश्रीफ यांनी दिल्या.

श्री. मुश्रीफ यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रतिनिधित्व स्वरूपात आपले मनोगत व्यक्त केले.

## वनप्लसने सादर केली नवी नॉर्ड सीईं६ सिरीज

**पुणे (दै. संध्या)**




जागतिक तंत्रज्ञान ब्रँड वनप्लसने आज भारतात अधिकृतपणे नवीन वनप्लस नॉर्ड सीईं६ आणि वनप्लस नॉर्ड सीईं६ लाईट लॉन्च केले. परफॉर्मन्स, गेमिंग, बॅटरी लाइफ, इमेजिंग आणि सॉफ्टवेअर या सर्व बाबतीत दमदार अनुभव देण्यासाठी तयार केलेली ही नॉर्ड सीईं६ सिरीज फ्लॅगशिप-इन्स्पायर्ड इनोव्हेशन, लॉंग-लास्टिंग रिलायबिलिटी आणि इमर्सिव्ह एंटरटेनमेंट यांचा संगम आहे. वनप्लस नॉर्ड सीईं६ ची विक्री 8 मे 2026 रोजी दुपारी 12 वाजता सुरू होईल, तर वनप्लस नॉर्ड सीईं६ लाईट ची विक्री 12 मे 2026 रोजी दुपारी 12 वाजता सुरू होईल. वनप्लस नॉर्ड सीईं६ हा एक “ऑल राउंड बीस्ट” आहे, जो टॉप-टियर परफॉर्मन्स आणि एंड्युरन्सची मागणी करणाऱ्या युजर्ससाठी खास तयार करण्यात आला आहे. स्नॅपड्रॅगन® 7 एस चौथी पिढी मोबाईल प्लॅटफॉर्मवर आधारित हा फोन 144 फ्रेम्स प्रति सेकंद गेमिंग आणि 6 तासांपर्यंत बीजीएमआय प्ले देतो. वनप्लस 15 सिरीजमधील डेडिकेटेड टच रिफ्लेक्स चिपमुळे सेगमेंटमधील सर्वात वेगवान ३२०० हर्ट्झ टच सॅम्पलिंग रेट मिळतो. यामध्ये 6.78 इंच 1. ५के अमोलेड डिस्प्ले आहे, ज्यामध्ये 144 हर्ट्ज़ रिफ्रेश रेट, ड्युअल स्टीरिओ स्पीकर्स (300% अल्ट्रा व्हॉल्यूम) आणि अक्वा टच 2.0 दिले आहे. हे सर्व फीचर्स युजरला इमर्सिव्ह कंट्रोल देतात. यासोबतच हार्डवेअर लेव्हल ब्लू लाईट आणि फ्लिकर फिल्टरिंगमुळे डोळ्यांचे संरक्षण होते. 8000एमएएच ची मोठी बॅटरी 2.5+ दिवसांचा वापर देते. यामध्ये वॅट सुपरव्हूक फास्ट चार्जिंग, ऑल-सीनारिओ बायपास चार्जिंग आणि २७ वॅट वायर्ड रिव्हर्स चार्जिंग सपोर्ट आहे.

व्हिव्हिड मिंट आणि हायपर ब्लॅक या रंगांमध्ये उपलब्ध

किंमत आणि उपलब्धता : वनप्लस नॉर्ड सीईं६ ची ओपन सेल भारतात 8 मे 2026 रोजी दुपारी 12 वाजता सुरू होईल. तर वनप्लस नॉर्ड सीईं६ लाईट ची ओपन सेल भारतात 12 मे 2026 रोजी दुपारी 12 वाजता सुरू होईल.

नॉर्ड सीईं६ ८+१२८जीबी २९,९९९ रुपये २,००० रुपये २७,९९९ रुपये
८+२५६जीबी ३२,९९९ रुपये २,००० रुपये ३०,९९९ रुपये

नॉर्ड सीईं६ लाईट ८+१२८जीबी २०,९९९ रुपये २,००० रुपये १८,९९९ रुपये
८+२५६जीबी २२,९९९ रुपये २,००० रुपये २०,९९९ रुपये
८+२५६जीबी २५,९९९ रुपये २,००० रुपये २३,९९९ रुपये

## प्रतिबंधात्मक उपाय व जनजागृती, हीच थॅलेसेमियाविरुद्धची लढाई

**पुणे (दै. संध्या)**

जागतिक थॅलेसेमिया दिवस दर वर्षी ८ मे रोजी साजरा केला जातो. या रक्तविकाराबद्दल जनजागृती करणे, रुग्णांचे मनोबल वाढवणे आणि प्रतिबंधात्मक उपायांवर भर देणे हे या दिवसाचे महत्त्व आहे. थॅलेसेमिया हा आनुवंशिक आणि जन्मजात आजार आहे. या आजारात लाल रक्तपेशींच्या निर्मितीची गुणवत्ता बदलते. ती योग्य पद्धतीने काम करत नसल्यामुळे बाहेरून लाल रक्तपेशी घ्याव्या लागतात. रुग्णांना चढविलेल्या रक्ताद्वारेच ती त्यांना मिळते. त्या लाल पेशींचा रुग्णांच्या शरीरात कार्यान्वित राहण्याचा काळही अत्यल्प असतो. अगदी दोन किंवा तीन आठवड्यांनी त्यांना हे रक्त भरून घ्यावे लागते. टक्केवारीनुसार या आजाराचे रुग्ण कमी असले, तरी त्या रुग्णासह संपूर्ण कुटुंबालाच त्याचा सामना करावा लागतो. हा आजार जन्मजात आहे. थॅलेसेमियाचे निदान वयाच्या सहाव्या ते बाराव्या महिन्यापर्यंत होते. बाळाची योग्य वाढ न होणे, रक्त कायम कमी राहणे, कावीळ होणे अशा लक्षणांमुळे विशेष तपासणी केल्यानंतर त्या बाळाला थॅलेसेमिया असल्याचे लक्षात येते. थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांना बाहेरून रक्त चढवणे हा पहिला आणि महत्त्वाचा उपचार. या आजारात सातत्याने रक्त घ्यावे लागते. बोन मॅरो ट्रान्सप्लांट ही उपचारपद्धती या आजाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सध्या उपलब्ध आहे. परंतु, ती अत्यंत खर्चीक असून, त्याचा आठ ते १० लाखांपर्यंत खर्च येतो. यातही वयाच्या केवळ आठव्या वर्षापर्यंत यश येण्याची आणि भावंडांकडून मिळणारे बोन मॅरो जुळण्याची शक्यता अधिक असते. थॅलेसेमियाचा रुग्ण जन्माला येऊ नये यासाठी व्यापक प्रयत्न करण्याची गरज आहे. त्या अनुषंगाने ‘जनकल्याण’मार्फत विविध ठिकाणी थॅलेसेमिया आजाराविषयी प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजिले जातात.

## समाविष्ट गावात इमारतींच्या बनावट नोंदी, शहर प्रमुखांनी पुरावेच दिले

**पुणे (दै. संध्या)**

‘पुणे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट होणाऱ्या गुजर निंबाळकरवाडी येथील काही जणांनी बांधकामे न करता बनावट नकाशांद्वारे ग्रामपंचायतींकडे इमारती आणि बंगले बांधल्याच्या नोंदी केल्या. त्यानंतर त्याचा मिळकतकर लावून घेतला आहे,’ अशी माहिती शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) शहर प्रमुख वसंत मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. याप्रकरणी चौकशी करून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले. मोरे म्हणाले, ‘गुजर निंबाळकरवाडी हे गाव महापालिकेत समाविष्ट होण्याची कुणकुण लागल्याने येथील ग्रामपंचायतीचे सदस्य आणि सरपंच यांनी गावांमध्ये २००७ मध्ये तयार केलेले बांधकामांचे नकाशे जोडून रिकाम्या जागांवर निवासी आणि व्यावसायिक इमारती, गाळे उभारल्याचे भासवून ग्रामपंचायतीत मिळकतकर लावून घेतला. ग्रामसेवक आणि इतर सेवकांनी यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली. सध्या गुजर निंबाळकरवाडीतील विविध भागांत प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेल्या ३००हून अधिक मिळकती असल्याचे पुरावे महापालिका आयुक्तांना दिले आहेत.’

## नसरापूर प्रकरणातील नराधमास १२ मेपर्यंत पोलीस कोठडी

**पुणे (दै. संध्या)**

नसरापूर येथे एका चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या ६५ वर्षीय नराधमाला पुणे न्यायालयाने १२ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणामध्ये नागरिकांमध्ये असलेला संताप आणि सुरक्षेची परिस्थिती पाहता, आरोपीला बुधवारी प्रत्यक्षात न्यायालयात न आणता गुरुवारी दूरदृश्य प्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) विशेष न्यायाधीश एम. जी. चव्हाण यांच्यासमोर हजर करण्यात आले होते. ही संतापजनक घटना शुक्रवारी (१ मे) दुपारी तीन ते रात्री आठच्या दरम्यान राजगड पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली होती. पीडित मुलीच्या आईने या प्रकरणी पुणे ग्रामीण पोलिसांकडे तक्रार दिली होती. त्याची दखल घेत पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ (खून), ६४ (बलात्कार), ७४ (विनयभंग), १३७ (२), १४० (१), १४० (३) (अपहरण) आणि ‘पोक्सो’ कायद्यांतर्गत कठोर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

न्यायालयीन सुनावणीदरम्यान तपास अधिकारी विजयमाला पवार आणि विशेष सरकारी वकील अरुंधती ब्रह्मे यांनी आरोपीच्या पोलीस कोठडीची मागणी केली. ‘आरोपीची लैंगिक क्षमता चाचणी आणि रासायनिक विश्लेषण अहवाल तपासणी करण्यात आली आहे. तसेच, आरोपीने यापूर्वी अशा प्रकारचे गुन्हे केले आहेत का? किंवा पीडित मुलीवर आधीही अत्याचार केला होता का?, याचा शोध घेणे गरजेचे आहे. घटना घडल्यानंतर आरोपी त्याच्या खांद्यावर एक गाठोडे घेऊन जाताना सीसीटीव्ही चित्रीकरणामध्ये दिसत आहे. त्या गाठोड्याचा शोध घेणे बाकी असून त्यात नेमके काय होते याबाबत देखील तपास करणे बाकी आहे. तसेच आरोपी आणि मुलगी गोठ्यात जात असताना त्याच्या हातात शेवपुडा देखील दिसून आला आहे. ती शेव नेमक्या कोणत्या दुकानातून घेतली याबाबत तपास करणे आहे,’ असे पोलिसांनी न्यायालयात सांगितले. पीडित मुलीच्या शरीरावर ज्या जखमा आढळून आल्या आहेत, त्या कोणत्या हत्याराने करण्यात आल्या आहे याबाबतचा तपास करणे आहे.आरोपीने चिमुकलीची हत्या करण्यासाठी नेमक्या कोणत्या हत्याराचा वापर केला, ते अद्याप हस्तगत करायचे असून महत्त्वाचे पुरावे गोळा करायचे आहेत. ज्या साक्षीदारांनी आरोपीला मुलीला घेऊन जाताना पाहिले, त्यांचे जबाब नोंदवण्याचे कामही सुरू आहे. या गुन्ह्यात आरोपीला अन्य कोणाची मदत लाभली आहे का, याचीही कसून चौकशी पोलीस करत आहेत.

# महावितरण अजिंक्यपदाकडे; खो-खोमध्ये (महिला) विजेतेपद

**पुणे (दै. संध्या)**



अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय स्पर्धेत महावितरणने सलग दुसऱ्या दिवशीही दबदबा ठेवत अजिंक्यपदाकडे वाटचाल सुरु केली आहे. यामध्ये महावितरणच्या खो-खोच्या महिला संघाने विजेतेपद मिळवले आहे. तर कबड्डीमध्ये उपांत्य फेरीत तर खो-खो व बास्केटबॉलमध्ये पूर्वउपांत्य फेरीत महावितरणच्या संघाने प्रवेश केला आहे. बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात एमएसईबी होल्डिंग कंपनीद्वारे आयोजित या राष्ट्रीय स्पर्धेत गुरुवारी (दि. ७) खो-खोच्या महिला गटात महावितरण विरुद्ध राजस्थान असा अंतिम फेरीचा सामना झाला. यात महावितरणच्या कर्णधार भाग्यश्री फडतरे, सारिका जाधव, श्रेया जाधव, मोनिका भोसले यांनी आक्रमण व संरक्षणामध्ये दमदार कामगिरी करीत सामन्यावरील वर्चस्व कायम ठेवले. पहिल्या डावात १२ विरुद्ध ५ गुणांची आघाडी घेत दुसऱ्या डावात महावितरण संघाने सहा मिनिटे राखून खो-खोचे राष्ट्रीय विजेतेपद पटकावले. तर राजस्थानला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

खो-खोच्या पुरुष गटामध्ये महावितरण संघाने (१५) हरियाणा संघाचा (४) ११ गुणांनी सहज पराभव करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला. मात्र राजस्थान (६) विरुद्ध महापारेषण (५) संघात तुल्यबळ लढत झाली व राजस्थानने एक गुणाने निसटता विजय मिळवला. आता महावितरण विरुद्ध महापारेषण आणि हरियाणा विरुद्ध राजस्थान अशी अंतिम फेरीसाठी लढत होणार आहे. भारतीय खो-खो संघाचा कर्णधार प्रतिक वाईकर याच्यासह निशिकांत शिंदे, विराज कोटमकर, महेंद्र पाटील यांनी आक्रमण व संरक्षणामध्ये सातत्य कायम ठेवले असून सर्व साखळी सामन्यांत वर्चस्व मिळवले आहे. महापारेषणचा उत्कृष्ट खेळाडू विशाल सावंत व इतर सहकाऱ्यांवर आता बलाढ्य महावितरण संघाचा पराभव करण्याचे आव्हान आहे.

कबड्डीच्या पुरुष गटामध्ये पूर्वउपांत्य फेरीत बीएसईएस राजधानी दिल्ली संघ (४९) विरुद्ध महापारेषण (३९) यांच्या अतिशय अटीतटीची लढत झाली. केवळ तीन गुणांनी महापारेषणला पराभव पत्कारावा लागला. दिल्लीच्या संजीव छिकारा, हरदेव शर्मा, रवी प्रकाश व अनिल यांनी आक्रमक पवित्रा घेत महापारेषणचे शेवट्या मिनिटापर्यंत सुरु असलेले आक्रमण थोपवून धरले. यानंतर हिमाचल प्रदेश संघाने (३२) मध्यप्रदेश पॉवर मॅनेजमेंट संघाचा (७) सहज पराभव करून उपांत्य फेरी गाठली. तर महावितरण संघातील (३०) दीपक माने, अमित जाधव, नीलेश ठाकूर, अभिषेक नर, अजय शिंदे यांच्या आक्रमक पवित्र्याने तेलंगणा ट्रान्समिशन संघाचा (११) १९ गुणांनी आणि हरियाणा संघाने (४८) टाटा पॉवर मुंबई संघाचा (१७) पराभव करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

बास्केटबॉलच्या साखळी सामन्यांनी या स्पर्धेत दुसऱ्या दिवशी रंगत वाढली. यात महावितरण (३४) विरुद्ध तेलंगणा (२४) लढतीत महावितरणच्या पंकज गेडे, शिवछत्रपती पुरस्कार विजेता शत्रुघ्न गोखले, आशिष खानापुरे यांनी सामन्यावर नियंत्रण ठेवत विजय मिळवला. यासोबतच सुरजितसिंग, हरप्रितसिंग, सतेंदरसिंग यांच्या आक्रमणामुळे पंजाब संघाने (२१) उत्तराखंड संघाचा (८) पराभव केला. तर हरियाणा संघ (५४) विरुद्ध महापारेषण (६) लढतीत हरियाणाने एकतर्फी विजय मिळवला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या विवान याला ग्रेट आर्टिस्ट राजा रवि वर्मा पुरस्कार

पिंपरी, पुणे (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मधील इयत्ता पाचवीचा विद्यार्थी विवान पाटील याला चित्रकलेचा राष्ट्रीय स्तरावरील 'ग्रेट आर्टिस्ट राजा रवि वर्मा पुरस्कार' मिळाला आहे. प्राथमिक व माध्यमिक मधील विद्यार्थ्यांना चित्रकलेला प्रोत्साहन देण्यासाठी पुण्यातील "कलादर्पण" या संस्थेच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांच्या विविध गटात दरवर्षी चित्रकला स्पर्धा घेण्यात येतात. या वर्षीच्या ४ थ्या राष्ट्रीय कलादर्पण चित्रकला स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर एकूण २२ विद्यार्थ्यांच्या चित्रांची निवड करण्यात आली होती. यामध्ये ११ विद्यार्थ्यांना प्रथम आणि इतर ११ विद्यार्थ्यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले. प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना 'ग्रेट आर्टिस्ट राजा रवि वर्मा पुरस्कार' आणि स्मृतीचिन्ह व सायकल भेट देण्यात आली. द्वितीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह व मोबाईल भेट देण्यात आला. हा पुरस्कार मिळवणारा विवान पाटील हा एस. बी. पाटील स्कूलचा पहिलाच विद्यार्थी आहे. त्याला चित्रकला शिक्षक कुलदीप घाडगे यांनी मार्गदर्शन केले. शाळेच्या प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा, मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विवान पाटील याचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



### पुरंदरच्या शिरपेचात मानाचा तुरा : ओंकार कड यांची एनडीए परीक्षेत देशात 36 वी रँक

पुरंदर (दैनिक संध्या) : मेहनत, जिद्द, चिकाटी आणि देशसेवेची प्रबळ ओढ असेल तर कोणतेही उद्दिष्ट गाठता येते, हे नायगाव येथील ओंकार प्रितम कड यांनी आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (यूपीएससी) सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए) परीक्षेच्या निकालात ओंकारने अखिल भारतीय स्तरावर ३६ वा क्रमांक पटकावत पुरंदर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विशेष म्हणजे हे यश त्याने पहिल्याच प्रयत्नात संपादन केले आहे. ओंकारने सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य नियोजन आणि प्रामाणिक कष्टांच्या जोरावर हे यश मिळवले. त्याने यापूर्वीही शैक्षणिक क्षेत्रात आपले वर्चस्व सिद्ध केले होते. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नायगाव ग्रामस्थांच्या वतीने त्याचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात स्नेहा तावरे यांच्या गणेश वंदनेने झाली. या कार्यक्रमास निवृत्त लेफ्टनंट कर्नल एस. डी. हंगे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजय कोलते, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष बी. बी. कड, अक्षरसृष्टी संस्थेचे अध्यक्ष सिद्धनाथ पवार, मेजर दीपक जांभळे, सुबेदार मेजर संपत जगताप, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष अजिंक्य कड, आचार्य अत्रे प्रतिष्ठानचे सचिव गौरव कोलते, सोमेश्वर कारखान्याचे उपाध्यक्ष बाळासाहेब कामथे,पुरंदर सैनिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष नामदेव कुंभारकर, किशोर खळदकर,राहुल कड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना लेफ्टनंट कर्नल हंगे म्हणाले की, “ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे, फक्त त्यांना योग्य दिशा आणि मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. ओंकार कड याने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. एनडीए ही केवळ परीक्षा नसून ती देशसेवेचा मार्ग आहे. अशा यशस्वी तरुणांमुळे देशाचे भवितव्य अधिक सक्षम होत आहे. ओंकारसारख्या विद्यार्थ्यांनी इतर तरुणांसाठी प्रेरणास्थान बनावे.” यावेळी विजय कोलते यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, देशाला सक्षम आणि कर्तबगार सैन्य अधिकारी मिळावेत यासाठी खडकवासला येथे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीची स्थापना करण्यात आली.

# ममता बॅनर्जी सरकार बरखास्त

## राज्यपालांचा मोठा निर्णय, बंगालमध्ये भाजप सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा



**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठी घडामोड घडली आहे. मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यास नकार दिल्यानंतर राज्यपालांनी ममता बॅनर्जी यांच्या मंत्रिमंडळाला बरखास्त केलं आहे. विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसचा मोठा पराभव झाल्यानंतरही ममता बॅनर्जी यांनी सत्ता सोडण्यास नकार दिला होता. त्यानंतर राज्यपालांनी संवैधानिक अधिकारांचा वापर करत हा मोठा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. तृणमूल काँग्रेस प्रमुख ममता बॅनर्जी यांनी निवडणुकीचा निकाल हा जनादेश नसून कटकारस्थान असल्याचा आरोप केला होता. “आमचा पराभव जनतेमुळे नाही, तर निवडणूक प्रक्रियेत झालेल्या गैरप्रकारांमुळे झाला आहे,” असा दावा त्यांनी केला होता. ममता बॅनर्जी यांनी भाजपपेक्षा निवडणूक आयोगाविरोधातच आमची लढाई होती, असा गंभीर आरोप केला होता. “जवळपास 100 जागांवर जनादेश लुटण्यात आला. मतमोजणी जाणीवपूर्वक संथ करण्यात आली. आम्हाला हरवण्यासाठी संपूर्ण यंत्रणा वापरण्यात आली,” असा आरोप त्यांनी केला. आपण हरलेलो नाही, त्यामुळे लोकभवनात जाऊन राजीनामा देण्याचा प्रश्नच नाही असं म्हणत मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार नसल्याचं ममता बॅनर्जी यांनी स्पष्ट केलं. दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये भाजपच्या पहिल्या सरकारच्या शपथविधीची तयारी सुरू झाली आहे. 9 मे रोजी कोलकात्यातील ब्रिगेड परेड ग्राउंड येथे शपथविधी सोहळा पार पडणार असल्याची माहिती आहे. या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात सुरक्षा व्यवस्था तैनात केली जाणार आहे. या शपथविधी सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पराभवानंतर ममता बॅनर्जी यांनी राष्ट्रीय स्तरावर इंडिया आघाडी मजबूत करण्यावर भर देणार असल्याचं सांगितलं होतं. सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इंडिया आघाडीतील इतर नेत्यांनी मला पाठिंबा दर्शवला आहे, असं त्यांनी म्हटलं होतं. मी आता एक सामान्य नागरिक आहे. मी रस्त्यावर उतरून लढणार. अन्यायाविरोधात संघर्ष सुरू ठेवणार, असंही ममता बॅनर्जी यांनी स्पष्ट केलं होतं.

## शेतकरी महिला घेणार स्वामींची परीक्षा - “देऊळ बंद २”चा टीझर प्रदर्शित

### "देऊळ बंद २" च्या टीझरमध्ये शेतकरी महिलेने घेतलेली परीक्षा देण्यासाठी स्वामी समर्थ पुन्हा अवतरले



**पुणे (दै. संध्या) :**

श्रद्धा आणि अंधश्रद्धा, देव आणि नास्तिक यांच्यातील युद्धाने आजवर अनेक वळणे घेतली आहेत. मात्र, जेव्हा एक सामान्य स्त्री थेट देवालाच परीक्षेला बसवते, तेव्हा काय होते? याच उत्कंठावर्धक विषयावर आधारित २१ मे रोजी प्रदर्शित होणाऱ्या ‘वटवृक्ष एंटरटेनमेंट’ निर्मित बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित "देऊळ बंद २" चा टीझर आज श्री क्षेत्र अक्कलकोट येथील वटवृक्ष श्री स्वामी समर्थ मंदिरात प्रदर्शित करण्यात आला. अनेक स्वामी भक्तांच्या उपस्थितीत अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या दिमाखदार सोहळ्याला निर्माते आणि चित्रपटाच्या संपूर्ण टीमसह राजकीय, प्रशासकीय आणि सामाजिक कार्य करणाऱ्या मान्यवरांची उपस्थिती लाभली. या प्रसंगी दाखविण्यात आलेल्या टीझरने उपस्थित भक्तांच्या आणि रसिकांच्या मनात चित्रपटाची उत्सुकता अजूनच वाढली आणि सर्वांनी "देऊळ बंद २" आम्ही चित्रपटगृहात जाऊन नक्की बघणार अशी ग्वाही दिली. "देऊळ बंद २ - आता परीक्षा देवाची" च्या टीझरमध्ये आस्तिक शेतकऱ्याची नास्तिक पत्नी असणाऱ्या स्नेहल तरडे उद्विग्न अवस्थेत आपला नवरा देऊळ बंद करून चावी घेऊन कुठेतरी निघून गेला असल्याची तक्रार घेऊन स्वामींना बोलाविण्यासाठी अत्यंत रागाने वारुळावर दगड मारते आणि स्वामी प्रकट होतात कारण भक्ताने मनापासून बोलावले की देव येतोच. त्यानंतर स्वामींचा विविध वाहनातून प्रवास दाखवताना काही दिग्गज कलाकारांची झलक पाहायला मिळते. पुढच्या प्रसंगात स्वामी म्हणतात "अगं ए नास्तिके प्रत्येक युगात तुझ्या सारखे कित्येक रावण आणि कित्येक दुर्योधन पाहिलेत मी देवाची परीक्षा पाहणारे" त्यावर शेतकरी महिला म्हणते "लिहून देते, कधी शेतकरी नसल पाहिला." त्यांच्या या संवादावरून "देऊळ बंद २" मध्ये आपल्या कुटुंबासाठी आणि समाजासाठी एक गरीब शेतकरी महिला देवाची सुद्धा परीक्षा घेऊ शकते हे स्पष्ट होत आहे. शेवटच्या प्रसंगात स्नेहल तरडे स्वामींना परत जायला सांगतात पण तू परीक्षेला बसवलं आहे ना? त्यामुळे परीक्षा दिल्या शिवाय मी जाणार नाही... आता परीक्षा देवाची असे म्हणत स्वामी जायला नकार देतात. नदीकाठचा निसर्गरम्य परिसर, भव्य वडाचे झाड आणि एका बाजूला स्वामींची जरब तर दुसऱ्या बाजूला एका सामान्य स्त्रीचे धैर्य, असा हा सामना खिळवून ठेवणारा आहे. आता या परीक्षेत स्वामी कोणत्या प्रश्नांना समोरे जाणार आणि शेतकऱ्यांच्या कोणत्या समस्यांचे निवारण करणार? हे बघण्यासाठी प्रेक्षकांना २१ मे पर्यंत वाट बघावी लागणार आहे. २१ मे २०२६ रोजी प्रदर्शित होणाऱ्या वटवृक्ष एंटरटेनमेंट निर्मित "देऊळ बंद २" चे लेखन आणि दिग्दर्शन प्रविण विठ्ठल तरडे यांनी केले असून निर्मिती कैलाश वाणी, जयश्री कैलाश वाणी, कैवल्य वाणी आणि जुईली वाणी-सूर्यवंशी यांनी केली आहे. चित्रपटात मोहन जोशी आणि स्नेहल तरडे प्रमुख भूमिकेत दिसणार असून महेश मांजरेकर, प्रसाद ओक, मंगेश देसाई, ओम भुतकर, संस्कृती बालगुडे, जगन्नाथ निवंगुणे, सुनील अभ्यंकर, अतुल कुडले आणि प्रविण तरडे महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत.

## सोनी सबच्या ‘हस्तिनापुर के वीर’ मालिकेत भेटा तरुण कौरव आणि पांडवांना

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

सोनी सब भारतीय महाकाव्य महाभारत पुन्हा जिवंत करत आहे, त्याच्या सुरुवातीच्या टप्प्यांपासून. हस्तिनापुर के वीर प्रेक्षकांना पांडव आणि कौरवांच्या बालपणात घेऊन जाते, जिथे त्यांच्या अनुभवांनी त्यांना घडवलं आणि त्यांच्या श्रद्धा व निवडींचा पाया रचला.

या मालिकेत पांडव आणि कौरवांमधील सुरुवातीच्या नातेसंबंधांना प्रकाशझोतात आणलं आहे पांडव कर्माचे परिणाम शिकतात तर कौरवांना सत्ता कधी हातातून निसटू शकते हे जाणवतं. पांडवांची भूमिका अतर खान युधिष्ठिर च्या भूमिकेत, सुभाष खत्री भीमच्या भूमिकेत, उर्वा सावल्या अर्जुनच्या भूमिकेत, हरित गबानी नकुलच्या भूमिकेत आणि मयंक यादव सहदेवच्या भूमिकेत साकारत आहेत. लहान वयातच जबाबदारी, भावना आणि ओळख यांचा सामना करताना प्रत्येकजण वेगळ्या पद्धतीने अपेक्षांना प्रतिसाद देतो युधिष्ठिरचा कर्तव्यभाव, भीमचा सहजस्वभाव, अर्जुनची स्वतःला सिद्ध करण्याची जिद्द, तर नकुल आणि सहदेवची शांत उपस्थिती, निरीक्षण आणि स्वतःच्या मार्गाने जुळवून घेणं. याच्या उलट, कौरवांचं नेतृत्व आयुध भानुशाली दुर्योधनच्या भूमिकेत आणि शौर्य उपाध्याय दुःशासनच्या भूमिकेत करत आहेत. राजवाड्यातील वाढलेल्या संस्कारांमुळे त्यांच्यात आत्मविश्वास आणि ठामपणा दिसतो. त्यांचा अधिकारभाव आणि आपलेपणाची भावना सुरुवातीपासूनच त्यांच्या नातेसंबंधांना आकार देते, ज्यामुळे पांडवांशी त्यांचं वर्तन ठरू लागतं आणि पुढील नात्यांचा सूर सेट होतो. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना, अथर खान, जो युधिष्ठिरची भूमिका साकारणार आहे, म्हणाला, “युधिष्ठिर नेहमी योग्य गोष्ट करण्याचा प्रयत्न करतो, जरी ती सोपी नसली तरी. त्याची भूमिका करताना मला जाणवलं की एवढ्या लहान वयात तो किती मोठी जबाबदारी वाहतो. तो पटकन प्रतिक्रिया देत नाही, आधी विचार करतो आणि मग कृती करतो.

## सोनी सब कलाकारांनी सर्वात महत्त्वाच्या स्त्रीला दिला हृदयस्पर्शी सलाम

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

मदर्स डे हा फक्त दिनदर्शिकेतील एक दिवस नाही. हा क्षण आहे थांबून त्या शांत सामर्थ्याला, अमर्याद संयमाला आणि निस्वार्थ प्रेमाला वंदन करण्याचा, जे आई आयुष्यभर देते पण कधीही परतफेडीची अपेक्षा ठेवत नाही. यंदा आईचा दिवस साजरा करताना सोनी सबचे कलाकार गुलकी जोशी, दीक्षा जोशी, नितीन बाबू आणि ऋषी सक्सेना यांनी त्यांच्या आयुष्यातील अनोख्या आठवणी, जपलेल्या क्षणांचा आणि पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या जीवनमूल्यांचा अनुभव शेअर केला. कलाकारांनी त्यांच्या आईबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त केली, ज्या त्यांच्या भावनिक आधारस्तंभ ठरल्या आहेत. प्रत्येक आव्हानात आणि प्रत्येक टप्प्यावर त्यांच्या आईने त्यांना प्रोत्साहन दिले, आणि पडद्यावर तसेच पडद्यामागे त्यांचा प्रवास घडवला. गुलकी जोशी, जी यादें मध्ये सृष्टीची भूमिका साकारते, तिने सांगितले, “लहानपणापासून माझी आई माझी सर्वात मोठी पाठीराखी राहिली आहे आणि ती माझ्यासाठी धैर्याचं प्रतीक आहे. तिचं ते रूप मी आजही मनात जपून ठेवते. ती माझ्या आयुष्यातील सर्वात ताकदवान स्त्रियांपैकी एक आहे. तिने मला शिकवलं की आयुष्याकडे नेहमी दयाळूपणे आणि संयमाने पाहा, विशेषतः या वेगवान उद्योगात. जेव्हा गोष्टी कठीण होतात, तेव्हा मी तिच्याकडे धाव घेते आणि सगळं हलकं वाटायला लागतं. ती खरंच माझ्या प्रत्येक गोष्टीमागची भावनिक ताकद आहे.”



## आर्थिक वर्ष २०२७ साठी सकारात्मक दृष्टिकोन कायम

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**



जागतिक स्तरावरील आघाडीची मेटल फॉर्मिंग आणि इंजिनिअरिंग कंपनी, भारत फोर्ज लिमिटेडने ("बीएफएल") आज ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि आर्थिक वर्षाचे आपले आर्थिक निकाल जाहीर केले. आर्थिक वर्ष २०२६ च्या चौथ्या तिमाहीत कंपनीच्या कामगिरीत क्रमशः लक्षणीय सुधारणा दिसून आली. ही वाढ निर्यातीची वाढलेली मागणी, देशांतर्गत ऑटोमोटिव्ह क्षेत्रातील सुधारलेली कामगिरी आणि औद्योगिक व संरक्षण व्यवसायातील सातत्यपूर्ण मजबुतीमुळे झाली.

स्वतंत्रपणे विचार केल्यास, आर्थिक वर्ष २०२६ च्या चौथ्या तिमाहीत कंपनीचा रेव्हेन्यू मागील तिमाहीच्या तुलनेत ८.५% वाढून ₹२,२६० कोटी झाला. ईबीआयटीडीए ७.२% वाढून ₹६१० कोटी झाला, आणि मार्जिन २७.०% होते. करपूर्व नफा (कोणत्याही अपवादात्मक बाबींशिवाय) ₹४८६ कोटी होता, जो मागील तिमाहीच्या तुलनेत ९.७% वाढ दर्शवतो.

आर्थिक वर्ष २०२६ साठी, स्टॅन्डअलोन रेव्हेन्यू ₹८,३९६ कोटी आणि ईबीआयटीडीए ₹२,३१२ कोटी होता. एकत्रित महसूल मागील वर्षीच्या तुलनेत ११.२% वाढून ₹१६,८१२ कोटी झाला, तर एकत्रित ईबीआयटीडीए ५.९% वाढून ₹२,९२१ कोटी झाला. कंपनीचा ताळेबंद मजबूत असून, स्वतंत्र निव्वळ कर्ज-भागभांडवल गुणोत्तर ०.१८x आहे. आर्थिक वर्ष २०२६ दरम्यान, भारत फोर्जने ₹४,८१४ कोटींच्या नवीन ऑर्डर्स मिळवल्या, ज्यात ₹२,८१६ कोटींच्या संरक्षण क्षेत्रातील ऑर्डर्सचा समावेश आहे. आर्थिक वर्ष २०२६ च्या अखेरीस कंपनीची एकूण संरक्षण क्षेत्रातील ऑर्डर बुक ₹१०,९६१ कोटींवर पोहोचली, ज्यामुळे या क्षेत्रातील तिचे धोरणात्मक स्थान आणखी मजबूत झाले.

चौथ्या तिमाहीत, मालसाठा पुन्हा भरल्यामुळे आणि उत्तर अमेरिकेतील ट्रक उत्पादनात वाढ झाल्यामुळे निर्यातीत लक्षणीय सुधारणा झाली. उत्तर आणि मध्य अमेरिकेला होणाऱ्या प्रवासी वाहनांच्या निर्यातीतही मोठी वाढ दिसून आली. एरोस्पेस क्षेत्रातील कामगिरीतही सुधारणा झाली असून, कंपनीने इंजिन, स्ट्रक्चरल आणि लँडिंग गिअरच्या सुट्या भागांसाठी नवीन ग्राहक मिळवले आहेत.

जीएसटीमुळे मिळालेल्या औद्योगिक लाभांनी देशांतर्गत व्यावसायिक वाहनांच्या मागणीला जोरदार पाठिंबा दिला, तर प्रवासी वाहनांच्या उत्पादनानेही चांगली गती कायम राखली. ऊर्जा, बांधकाम आणि खाणकाम, कृषी आणि मशिन टूल्स यांसारख्या क्षेत्रांमधील मजबूत मागणीमुळे कंपनीच्या औद्योगिक व्यवसायालाही फायदा होत राहिला.

या कामगिरीवर भाष्य करताना, भारत फोर्ज लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, बाबा कल्याणी म्हणाले: “मागण्यांसंदर्भातील आव्हाने आणि बदलत्या नियमांनंतरही, भारत फोर्जने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये दमदार कामगिरी केली. वर्षाच्या उत्तरार्धात वाढलेली निर्यातीची मागणी आणि सर्व व्यवसायांमधील सुधारित कामगिरीमुळे हे शक्य झाले. कंपनीला यावर्षी ₹४,८१४ कोटींच्या नवीन ऑर्डर्स मिळाल्या, ज्यात ₹२,८१६ कोटींच्या संरक्षण क्षेत्रातील ऑर्डर्सचा समावेश आहे. आर्थिक वर्ष २०२६ च्या अखेरीस एकूण संरक्षण क्षेत्रातील ऑर्डर बुक ₹१०,९६१ कोटींवर पोहोचले होते.

## एशियन पेंट्सद्वारा सादर त्यांची नवीन कॉर्पोरेट मोहीम- ‘रंगांची वॉरंटी’

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**




भारतात, पत्ते आणि दिशा म्हणजे केवळ रस्त्यांची नावे किंवा पिन कोडच नाहीत. तर ते अनेकदा ‘निळ्या घरा नंतर डावीकडे वळा’ किंवा ‘ते लाल घर जिथे प्रत्येक सणासुदीला पाहुणे येतात’ अशा आठवणींना उजाळा देतात. ज्या देशात रंग सर्वत्र सर्वव्यापी आहे, तिथे घरे म्हणजे केवळ रंगवलेल्या भिंती नाहीत, तर ती सुपरिचित चिन्हे बनतात, ज्यांना लोक ओळखतात आणि त्यांच्याशी नाते जोडतात. ‘रंग म्हणजेच खरा पत्ता’ या कल्पनेच्या आधारे, एशियन पेंट्स आपली नवीन मोहीम ‘रंगांची वॉरंटी’ सादर करत आहेत, जी गेल्या वर्षी ‘एशियन पेंट्सची वॉरंटी असे भारतातील प्रत्येक दुसरे घर सांगते’ या मोहिमेद्वारे सुरू केलेला संवाद पुढे नेते. एका उबदार, भावनिक गाण्यावर आधारित हा चित्रपट, एशियन पेंट्सने रंगवलेली भारतीय घरे दैनंदिन जीवनाचा आणि आठवणींचा भाग कशी बनतात हे दाखवतो. आयुष्य बदलले तरी, हे रंग कसे तसेच राहतात; ते केवळ रंग न राहता, लोकांच्या ओळखीच्या परिचित जागा बनतात; साध्या, सहज जुळणाऱ्या क्षणांच्या माध्यमातून हा चित्रपट यावर जोर देतो. हा चित्रपट एशियन पेंट्सचे दीर्घकाळ टिकणारे रंग केवळ भिंतींवरच राहत नाहीत, तर ते लोकांच्या मनातही घर करतात आणि कालांतराने घरांची खरी ओळख बनतात, ही जाणिव दृढ करतो. ही मोहीम एशियन पेंट्ससाठी ‘वॉरंटी’चा अर्थ काय आहे, हे प्रतिबिंबित करते. ही मोहीम केवळ दीर्घकाळ टिकणाऱ्या रंगाबद्दल नाही, तर भिंतींच्या सभोवताली निर्माण झालेल्या आठवणी आणि जिव्हाळ्याचे रक्षण करण्याच्या वचनाबद्दल देखील आहे. आठ दशकांहून अधिक काळ, एशियन पेंट्स भारतातील लहान शहरांपासून ते मोठ्या महानगरांपर्यंत, घरांचा आणि हृदयांचा एक हिस्सा बनले आहेत. गेल्या वर्षीच्या मोहिमेने विश्वासाचा हा वारसा सजीव केला आणि देशभरातील लोक एशियन पेंट्सवर कसे अवलंबून असतात हे दाखवून दिले. गेल्या वर्षभरात, ‘दशकांचा विश्वास’ सारख्या छापील जाहिरातींपासून ते एशिया कप दरम्यान ‘वॉरंटी काउंटडाउन’ सारख्या सांस्कृतिक क्षणांपर्यंत, अनेक उपक्रमांद्वारे हा संदेश अधिक दृढ करण्यात आला. ‘रंगांची वॉरंटी’ ही रंगांच्या माध्यमातून पाहिली जाणारी अशीच एक नैसर्गिक उत्क्रांती आहे, — हे एक असे अवकाश आहे, जे भारतीयांशी असलेल्या खोल भावनिक नात्यातून ब्रँडने आपलेसे केले आहे. या मोहिमेबद्दल बोलताना, एशियन पेंट्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, अमित सिंगल म्हणाले, “आठ दशकांहून अधिक काळ, एशियन पेंट्सने भारतीय घरांत रंगत आणली आहे - पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे, ती त्यांच्या ओळखीचा एक भाग बनली आहे.

आमचा विश्वास आहे की, आमच्या वॉरंटीचे वचन अशा भिंतींवर प्रतिबिंबित होते, ज्या केवळ भक्कमपणे उभ्या राहत नाहीत, तर चैतन्यमय राहतात - उबदारपणा, एकमेकांशी वाटून घेतलेल्या प्रथा आणि काळासोबत अधिक मौल्यवान होणाऱ्या आठवणी जपतात.

## कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील यांची विशेष मुलाखत

मुंबई (दै. संध्या) : ‘दिलखुलास’ कार्यक्रमात डॉ. श्रीकांत पाटील यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे. ‘महाराष्ट्राची स्टार्टअप परिसंस्था, नवोपक्रम आणि उद्योजकतेचा नवा वेग’ या विषयावर आधारित या विशेष मुलाखतीत राज्यातील स्टार्टअप इकोसिस्टीमची वाटचाल, नव्या संधी, शासनाच्या धोरणात्मक उपक्रमांसह उद्योजकतेला मिळणारे बळ यावर सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. ‘दिलखुलास’ कार्यक्रमातून ही मुलाखत १२ ते १६ मे, २०२६ या कालावधीत रोज सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवर तसेच न्यूज ऑन AIR या मोबाईल ॲपवर प्रसारित होणार आहे.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-Tender Notice**

E-Tenders are being invited from reputed contractors registered with MSEDCL by the office of Chief Engineer Pune Zone, MSEDCL, Pune, with details as below,
Tender No. T-01/26-27: Supply Automatic Portable Fire Preventive Apparatus with Manual & Automatic Operation under Pune Zone, Tender Cost Rs.25 Lakhs
For details, please visit our website http://works.mahadiscom.in/eTender, Contact person: Shri. S. A. Sarode, Executive Engineer (Admn.), Phone Nos.: 020-26065740; Mb. No. 7875767003, email: cepuneurban@gmail.com, cepuneurban@mahadiscom.in
**(No. PRO/PZ/041/2026-27)** **Chief Engineer (PZ)**

**पुणे महानगरपालिका, पुणे**
निविदा प्रक्रिया कक्ष
ई-निविदा जाहिरात - फेर निविदा जाहिरात

विक्री कालावधी दिनांक : दि. ०८/०५/२०२६ ते दि. १५/०५/२०२६ २:३० पर्यंत
स्विकृती दिनांक : दि. ०८/०५/२०२६ ते दि. १५/०५/२०२६ २:३० पर्यंत
**जाहिरात क्र. २/१८ दि. ०७/०५/२०२६**
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक :- १८/०५/२०२६ ३.०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/ELECTRICAL/ 2025/385 | विद्युत विभाग | पुणे महानगरपालिकेच्या बाणेर मैलापाणी शुद्धीकरण केंद्र येथील प्रायमरी फाईन स्क्रीन पुरविणे, बसविणे व चालू करून देणे. | 6079.00 | 6904564.00 | 69046.00 | ६ महिने | श्री. प्रल्हाद पवार 9689937697 |

निविदा संचाची विक्री www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सूचनेत नमूद केलेल्या तारखेनुसार सुरू राहील. सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे. www.mahatenders.gov.in
सदरची ई-निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल Support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002 या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
अधिक्षक अभियंता (विद्युत)
पुणे महानगरपालिका

# दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका कटिबद्ध

## महापौर रवि लांडगे : महापौर चषक कबड्डी स्पर्धेला उत्साहात प्रारंभ; राज्यभरातील ८१२ खेळाडूंचा सहभाग

**पिंपरी (दै. संध्या)**

कबड्डी हा आपल्या मातीतला आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीशी जोडलेला खेळ आहे. युवा खेळाडूंना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि ग्रामीण भागातील प्रतिभेला संधी देणे, हा महापौर चषक स्पर्धेच्या आयोजनामागील मुख्य उद्देश आहे. पिंपरी चिंचवड शहर क्रीडा क्षेत्रातही अग्रस्थानी राहावे, यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे,' असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने भोसरी येथील गावजत्रा मैदानात आयोजित करण्यात आलेल्या 'महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा २०२६' चे उदघाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार महेश लांडगे, शंकर जगताप यांच्यासह



स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, पीएमपीएल अध्यक्ष डॉ. महेश आव्हाड, क्रीडा, कला, साहित्य आणि सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, नगरसदस्य योगेश लांडगे, कुंदन गायकवाड, उपायुक्त पंकज पाटील, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे उपखजिनदार प्रकाश बालवडकर, सहसचिव राजाभाऊ ढमढेरे, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते विराज लांडगे, राष्ट्रीय खेळाडू मच्छिंद्र लांडगे,पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला अध्यक्षा कविता आल्हाट, पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे माजी सचिव राजाभाऊ आंदेकर तसेच सहसचिव संदीप पायगुडे,सामाजिक कार्यकर्ते राहूल लांडगे,स्वप्नील लांडगे,शिवराज काटे यांच्यासह खेळाडू आणि नागरिक उपस्थित होते. महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा ही १० मेपर्यंत चालणार असून, या स्पर्धेत राज्यभरातील नामांकित कबड्डी संघांच्या एकूण ८१२ खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे. यामध्ये पुरुष गटातील ३६ आणि महिला गटातील २४ संघ आहेत. स्पर्धेचे सामने सुरळीत आणि शिस्तबद्ध पार पडावेत, यासाठी तब्बल ५५ सामनाधिकारी कार्यरत आहेत.

महापौर रवि लांडगे म्हणाले,' राज्यस्तरीय स्तरावर होत असलेल्या या स्पर्धेमुळे पिंपरी चिंचवड शहरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले असून, युवा खेळाडूंना मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. कबड्डीसारख्या मातीतल्या खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी महानगरपालिका सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे, असे देखील त्यांनी सांगितले.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, 'पिंपरी चिंचवड शहरातील क्रीडा संस्कृती अधिक बळकट करण्यासाठी अशा राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन अत्यंत आवश्यक आहे. कबड्डीसारख्या पारंपरिक खेळांना प्रोत्साहन मिळाल्यास ग्रामीण भागातील खेळाडूंना मोठ्या स्तरावर आपली क्षमता सिद्ध करण्याची संधी मिळते.'

आमदार शंकर जगताप म्हणाले की, 'युवा पिढीने खेळांकडे करिअरच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. पिंपरी चिंचवड शहरात विविध उपक्रम राबवत खेळाडूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.'

स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे म्हणाले की, 'महापौर चषक स्पर्धेमुळे राज्यभरातील खेळाडूंना एक दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. शहरात अशा स्पर्धांमुळे क्रीडाप्रेमी नागरिकांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण होत आहे.'

सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे म्हणाले की, 'कबड्डी हा महाराष्ट्राच्या संस्कृतीशी जोडलेला खेळ असून त्याच्या संवर्धनासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. युवा खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी महानगरपालिका सातत्याने कार्यरत आहे.'

क्रीडा, कला, साहित्य आणि सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे म्हणाले की, 'महापौर चषक स्पर्धेमध्ये राज्यभरातील संघांचा उत्स्फूर्त सहभाग लाभल्याबद्दल समाधान वाटते. आगामी काळात आणखी मोठ्या प्रमाणात क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून शहराची क्रीडा ओळख अधिक मजबूत करण्यात येईल.'

### १७ लाख ५० हजार रुपयांची पारितोषिके

या स्पर्धेत विजयी होणाऱ्या संघांना रोख बक्षिसे आणि आकर्षक सन्मानचिन्हे प्रदान करण्यात येणार आहेत. पुरुष व महिला गटातील प्रथम क्रमांकाच्या संघाला प्रत्येकी २ लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी १ लाख ५० हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी १ लाख रुपये तसेच चतुर्थ क्रमांकासाठी १ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. तसेच उपउपांत्य फेरीत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक पुरुष व महिला संघास प्रत्येकी २५ हजार रुपयांचे प्रोत्साहनपर बक्षीस दिले जाणार आहे. याशिवाय उत्कृष्ट खेळाडूंनाही विशेष वैयक्तिक पुरस्कार देण्यात येणार असून "दिवसाचा मानकरी", "उत्कृष्ट चढाई", "उत्कृष्ट पकड" आणि "अष्टपैलू खेळाडू" या विभागांमध्ये रोख पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. स्पर्धेतील एकूण बक्षीस रक्कम १७ लाख ५० हजार रुपये इतकी असून, त्यामुळे राज्यभरातील कबड्डीपटूंमध्ये या स्पर्धेबाबत मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...





### नगरसेवक कुणाल वाव्हळकर यांच्या आक्रमक भूमिकेमुळे पाण्याचा प्रश्न सुटणार..!

पिंपरी (दैनिक संध्या) : वाकड–ताथवडे परिसरातील वाढत्या पाणीटंचाईच्या प्रश्नावर नगरसेवक कुणाल वाव्हळकर यांनी आक्रमक भूमिका घेतल्याने आता हा प्रश्न मार्गी लागण्याची चिन्हे दिसत आहेत. पाणीपुरवठा विभागाच्या कामकाजावर त्यांनी थेट सवाल उपस्थित करत जलकुंभ प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली आहे. ताथवडे परिसरात उभारण्यात येत असलेल्या २५ लाख लिटर क्षमतेच्या जलकुंभांचे काम अंतिम टप्प्यात असले तरी प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. त्यामुळे नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावे लागत असून नाराजी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वाव्हळकर यांनी प्रशासनाला धारेवर धरत जलकुंभ तातडीने कार्यान्वित करण्याचे निर्देश दिले. तसेच वितरण नलिका, वीज जोडणी व पंपिंग यंत्रणा यांसारख्या तांत्रिक बाबी लवकर पूर्ण करून निश्चित वेळेत पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. "नागरिकांना पाणीपट्टी भरूनही टँकरवर अवलंबून राहावे लागणे ही गंभीर बाब आहे. टँकर माफियाला आळा घालून नियमित पाणीपुरवठा देणे आवश्यक आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. नगरसेवकांच्या या आक्रमक भूमिकेमुळे प्रशासनावर दबाव वाढला असून, येत्या काही दिवसांत जलकुंभ प्रकल्प पूर्ण होऊन वाकड–ताथवडे परिसरातील नागरिकांची पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात सुटेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



### पिंपरी चिंचवड शहरातील 10 इंग्रजी शाळा अनधिकृत; पालकांना महापालिकेचा इशारा

पिंपरी (दैनिक संध्या) : आगामी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने शहरातील अनधिकृत शाळांविरोधात कडक भूमिका घेतली आहे. शहरातील १० इंग्रजी माध्यमाच्या शाळांना अनधिकृत घोषित करण्यात आले असून, या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेश घेऊ नयेत, असे आवाहन शिक्षणाधिकारी संगीता बांगर यांनी पालकांना केले आहे. महापालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडून जारी करण्यात आलेल्या माहितीनुसार, संबंधित शाळांनी शासनाने ठरवून दिलेले आवश्यक निकष पूर्ण केलेले नाहीत. तसेच, आवश्यक मान्यता व तांत्रिक कागदपत्रांची पूर्तता करण्यातही त्या शाळा अपयशी ठरल्या आहेत. यापूर्वी अनेकदा नोटिसा देऊनही त्रुटी दूर करण्यात आल्या नसल्याने प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. दरम्यान, १ जूनपासून या शाळांवर प्रत्यक्ष कारवाई सुरू केली जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्रतिबंध करण्यासाठी शाळांच्या प्रवेशद्वारावर "येथे प्रवेश घेऊ नये" असे फलक लावण्यात येणार असल्याची माहितीही प्रशासनाने दिली आहे. महापालिकेने स्पष्ट केले आहे की, अनधिकृत शाळांमध्ये शिक्षण घेतल्यास विद्यार्थ्यांना भविष्यात गंभीर अडचणींचा सामना करावा लागू शकतो. बोर्डाच्या परीक्षा देताना, शाळा सोडल्याचा दाखला (LC) मिळवताना तसेच उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेताना कायदेशीर अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. दरम्यान, संबंधित शाळांकडून प्रशासनाकडे मुदतवाढीची मागणी करण्यात आली आहे. शाळा व्यवस्थापनाचे म्हणणे आहे की, शाळा अधिकृत करण्याची प्रक्रिया अत्यंत किचकट असून अटी जाचक आहेत. तसेच, विद्यार्थ्यांना युआयडी व अपार आयडी देण्यात येत असल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, असा दावा त्यांनी केला आहे.

अनधिकृत इंग्रजी माध्यमाच्या शाळांची यादी पुढीलप्रमाणे : ब्लोमिंग बर्ड्स, ताथवडे, लिटील स्टार इंग्लिश मिडीयम स्कूल, चिंचवडेनगर, माऊंट एव्हरेस्ट इंग्लिश स्कूल, कासारवाडी, डी. एम. के. इंटरनॅशनल स्कूल, कासारवाडी, माने इंग्लिश मिडीयम स्कूल, काळेवाडी, नर्चर इंटरनॅशनल स्कूल, काळजेवाडी, चऱ्होली, माईंडवर्ल्ड इंटरनॅशनल स्कूल, काळजेवाडी, चऱ्होली, हेम्स इंटरनॅशनल स्कूल, वाकड, कॅटलिस्ट इंटरनॅशनल स्कूल, चऱ्होली फाटा, गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल, मोशी

**"अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घेऊ नये, असे आवाहन पालकांना करण्यात येत आहे. या शाळांकडे आवश्यक मान्यता नसल्याने विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पालकांनी योग्य शाळेची खातरजमा करूनच प्रवेश घ्यावा."**

**– संगीता बांगर (शिक्षणाधिकारी)**

## नसरापूर घटनेचे महापालिका सभेत तीव्र पडसाद

**पिंपरी (दै. संध्या)**

भोर तालुक्यातील नसरापूर येथे घडलेल्या अत्याचाराच्या घटनेने संपूर्ण शहर हादरले असून, या घटनेचे अत्यंत तीव्र पडसाद पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत उमटले. या अमानवीय घटनेचा निषेध करत असतानाच, शहरातील ढासळलेल्या कायदा व सुव्यवस्थेबाबत नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले. महापौर रवी लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सभेत, शहरातील महिलांची सुरक्षा आणि गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी महापालिका आयुक्त आणि पोलीस आयुक्त यांनी तातडीने संयुक्त बैठक घेऊन ठोस कृती आराखडा तयार करावा,



**■ पोलीस आयुक्तांसोबत तातडीने बैठक घेण्याची सभापती अभिषेक बारणे यांची मागणी**

अशी आग्रही मागणी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी केली. सभेला संबोधित करताना अभिषेक बारणे यांनी अत्यंत भावूक आणि आक्रमक भूमिका मांडली. ते म्हणाले की, नसरापूरची घटना केवळ हृदय पिळवटून टाकणारी नसून ती समाजाच्या संवेदनशीलतेवर मोठा आघात आहे.

## मावळात बाल वारकरी संस्कारांची अनोखी परंपरा

### श्री विठ्ठल परिवाराच्या प्रशिक्षण शिबिरात 'बाल यशवंतराव' समर्थ जाधवची उपस्थिती; बाल वारकऱ्यांमध्ये उत्साह

**मावळ (दै. संध्या)**

श्री विठ्ठल परिवार मावळ (संस्थापक आमदार सुनिल आण्णा शेळके) व सकल दिंडी नियोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या "बाल वारकरी प्रशिक्षण शिबिराला" यंदाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गेल्या सहा वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमातून मुलांवर चांगले संस्कार व्हावेत, तसेच मोबाईलच्या आहारी जाण्यापासून मुले दूर राहावीत, या उद्देशाने हे शिबिर भरविण्यात येत आहे. जांभुळ येथील जिल्हा परिषद शाळेत सुरू असलेल्या या शिबिरात पहाटेपासूनच विविध उपक्रम राबवले जात आहेत. योगा, गीता पाठ, हरिपाठ, मृदूंग व हार्मोनियम






प्रशिक्षण यासह वारकरी संप्रदायाची सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली जात आहे. त्याचबरोबर ज्ञानेश्वरीच्या प्रत्येक अध्यायावर सकाळ व दुपार अशा दोन सत्रांत निरूपण घेतले जाते. विविध विषयांवर कीर्तनाचेही प्रशिक्षण दिले जात असल्याने बाल वारकरी उत्साहाने सहभागी होत आहेत. शिबिरासाठी विविध मान्यवर कीर्तनकार, प्रवचनकार व वारकरी संप्रदायातील अभ्यासक मार्गदर्शन करत असून विद्यार्थ्यांसाठी निवासी व्यवस्था, सात्विक आहार आणि धार्मिक वातावरणाची विशेष सोय करण्यात आली आहे. दरम्यान, या शिबिराचे आणखी एक आकर्षण म्हणजे मराठी चित्रपटसृष्टीतील बालकलाकार समर्थ जाधव याची उपस्थिती. वडगाव मावळ येथील समर्थ जाधव याने अनेक मराठी चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या असून नुकत्याच प्रदर्शित झालेल्या "राजे शिवछत्रपती" मालिकेत त्याने बाल यशवंतराव यांची भूमिका साकारली आहे. तसेच "जुने फर्निचर", "फिरस्ता", "तुरियम" यांसारख्या चित्रपटांतही त्याने काम केले आहे. समर्थ जाधव शिबिरात सहभागी झाल्याने इतर बाल वारकरीही आनंदित झाले असून त्याच्यासोबत संवाद साधण्यासाठी मुलांमध्ये उत्सुकता पाहायला मिळत आहे. संस्कार, अध्यात्म आणि परंपरेची जोड देणारे हे शिबिर मावळ तालुक्यात विशेष चर्चेचा विषय ठरत आहे.

## सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत बैठक संपन्न



**पिंपरी (दै. संध्या)**

शहराची स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्य टिकवून ठेवण्यामध्ये सफाई कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मात्र, काम करताना त्यांना आरोग्यविषयक धोके, साधनांची कमतरता आणि प्रशासकीय अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे त्यांच्या समस्या केवळ नोंदवून न ठेवता त्या तातडीने आणि संवेदनशीलतेने सोडवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात आयोजित सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व प्रश्नांबाबत राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीच्या प्रारंभी महापौर रवि लांडगे यांनी राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांचे स्वागत केले.

या बैठकीस आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, सह शहर अभियंता प्रेरणा सिनकर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, संदीप खोत, अण्णा बोदडे, पंकज पाटील, अतुल पाटील, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, अश्विनी गायकवाड, पूजा दूधनाळे, निवेदिता घार्गे, कार्यकारी अभियंता राजेंद्र जावळे, राजेंद्र शिंदे, जाहिरा मोमीन, महेश बरीदे, विनय ओहोळ, सोहन निकम, मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, आरोग्य निरीक्षक यांच्यासह सफाई कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी सागर चरण, गणेश भोसले, किशन आरडे, अनिल चावरे, मुकेश लोट, अनिल लखन, राजेश काकडे, करण चव्हाण, मोश पुन्ने, दर्पण चोपडे, सायली चनगुंडी आदी उपस्थित होते.

शेरसिंग डागोर म्हणाले, सफाई कर्मचाऱ्यांना सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने विविध धोरणे राबवली आहेत. मात्र, या योजनांचा लाभ प्रत्यक्षात कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी महापालिका प्रशासनाने अधिक सक्रिय भूमिका घ्यावी.

## ऑनलाइन शिक्षणामुळे पारंपारिक प्रशिक्षण केंद्रांवर संकट

**पिंपरी (दै. संध्या)**

डिजिटल युगाच्या वेगवान प्रवाहात शिक्षण पद्धतीत मोठे बदल होताना दिसत आहेत. एकेकाळी विविध कौशल्य प्रशिक्षण केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांची गर्दी असायची. शाळांना उन्हाळ्याच्या सुट्या लागल्या की शॉर्टटर्म कॉम्प्यूटर कोर्स करण्यासाठी प्रशिक्षण केंद्रांमध्ये मोठी गर्दी होत. परंतु आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. अनेक संस्था अत्यंत कमी शुल्कात किंवा अगदी मोफत संगणक प्रशिक्षण, कौशल्य विकास कोर्सेस, व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण देत असल्याने मार्केटमध्ये असलेल्या प्रशिक्षण केंद्रांवर संक्रांत आली आहे. यामागचे मुख्य कारण म्हणजे सोशल मीडिया आणि ऑनलाइन शिक्षणाची झपाट्याने वाढ हे आहे. आजच्या पिढीला माहिती आणि शिक्षणासाठी घराबाहेर पडण्याची गरज उरलेली नाही. मोबाईल फोन आणि इंटरनेटच्या मदतीने युट्यूब, ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स आणि विविध ॲप्सवर हजारो कोर्सेस सहज उपलब्ध होत आहेत. हे कोर्सेस बहुतेक वेळा मोफत किंवा अत्यंत स्वस्त दरात मिळत असल्यामुळे विद्यार्थी त्याकडे अधिक आकर्षित होत आहेत. घरबसल्या, आपल्या वेळेनुसार आणि सोयीने शिकण्याची सुविधा मिळत असल्याने पारंपरिक प्रशिक्षण केंद्रांकडे जाण्याची गरज विद्यार्थ्यांना वाटत नाही. याशिवाय, बाहेर जाऊन प्रशिक्षण घेण्यासाठी लागणारा वेळ, प्रवासाचा खर्च आणि दैनंदिन धकाधकीतून वेळ काढण्याचा त्रासही विद्यार्थ्यांना टाळायचा असतो. त्यामुळे मोबाईलवर शिकणे हा अधिक सोयीस्कर आणि आकर्षक पर्याय ठरत आहे.

# विरोधी पक्ष ही भाजपची "बी" टीम : चेतन पवार

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत विरोधी पक्ष सक्षम भूमिका घेत नाही. या महापालिकेतील विरोधी पक्ष महाराष्ट्रात भाजप बरोबर सत्तेत सहभागी आहे. म्हणजेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील विरोधी पक्ष ही भाजपची "बी" टीम असल्याची टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नवनियुक्त शहराध्यक्ष चेतन पवार यांनी पत्रकार परिषदेत केली.

बुधवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत यावेळी उप जिल्हा प्रमुख रोमी संधू, शहर समन्वयक कैलास नेवासकर, पिंपरी



विधानसभा प्रमुख तुषार नवले, उपशहर प्रमुख अमोल निकम, शहर कार्यालय सचिव ज्ञानेश्वर शिंदे, उपशहर प्रमुख राजाराम कुदळे, पार्थ गुरव, बाळासाहेब जम, जिल्हा संघटिका अनिता तुतारे, उपजिल्हा संघटिका वैभवी घोडके, कल्पना शेटे, विभाग संघटिका बेबी सय्यद उपस्थित होते.

तत्पूर्वी शहर शिवसेनेच्या वतीने चेतन पवार यांच्या नेतृत्वाखाली पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक येथे नसरापूर आणि सहकारनगर पुणे येथील अल्पवयीन मुलींवर अत्याचार केलेल्या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. तसेच या घटनांची नैतिक जबाबदारी घेऊन मुख्यमंत्री, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी करण्यात आली. या घटनेबाबत भाजपा आमदार चित्रा वाघ यांनी केलेल्या वक्तव्याचा देखील शिवसेनेने निषेध केला.

पत्रकार परिषदेत चेतन पवार यांनी सांगितले की, आदरणीय हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आंदोलन आणि संघर्ष करीत शिवसेना पक्षाची स्थापना केली. शिवसेना पक्ष प्रमुख आदरणीय उद्धव ठाकरे, शिवसेना नेते खासदार संजय राऊत आणि पुणे जिल्हा संपर्क प्रमुख सचिन आहेर यांनी नुकतीच माझी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पिंपरी चिंचवड जिल्हा शहर अध्यक्षपदावर नियुक्ती केली आहे. पक्षाने माझ्यावर दाखवलेला विश्वास मी सार्थ ठरवेल. आगामी काळात लवकरच पिंपरी, चिंचवड, भोसरी या तीनही विधानसभा मतदार संघातील जुन्या, नव्या शिवसैनिकांना एकत्र घेऊन सर्वांशी योग्य समन्वय साधून नवीन शहर कार्यकारणी जाहीर करण्यात येईल. यामध्ये समाजातील सर्व घटकांना प्रतिनिधित्व देण्यात येईल. पिंपरी चिंचवड महापालिकेला कर्जबाजारी करणाऱ्या तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांच्या कारभाराची आणि नुकत्याच ५२ कोटी रुपयांच्या झालेल्या भ्रष्टाचाराविषयी माहिती घेऊन न्यायालयात दाद मागण्यात येईल. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत शिवसेनेला प्रतिनिधित्व नसले तरी दखील महापालिकेच्या कारभारावर व भ्रष्टाचारावर लक्ष ठेवण्यासाठी शिवसेनेचे प्रतिनिधी मंडळ नेमण्यात येईल. तसेच महिला सुरक्षा, पाणी, वाहतूक, आरोग्य, शिक्षण, रोजगार, अतिक्रमण, कायदा, सुव्यवस्था याविषयी सामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या प्रश्नाबाबत रस्त्यावर उतरून आंदोलने करण्यात येतील आणि भाजपचा तसेच विरोधी पक्षांचा खरा चेहरा जनतेसमोर आणण्याचे काम शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सर्व कार्यकर्ते वेळोवेळी करतील असेही चेतन पवार यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### युवानेते श्री जयदादा अजितदादा पवार यांच्या पहिल्याच जनता दरबाराला उत्स्फूर्त प्रतिसाद

बारामती (दैनिक संध्या) : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवानेते श्री जयदादा अजितदादा पवार यांनी आज बारामती येथे नागरिकांच्या समस्या तत्काळ मार्गी लावण्यासाठी जनता दरबाराची सुरुवात केली. पहिल्याच जनता दरबाराला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावत आपल्या विविध समस्या जय पवार यांच्यासमोर मांडल्या. जनतेच्या अडचणी समजून घेत श्री जय अजितदादा पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ दूरध्वनीद्वारे सूचना देत अनेक प्रश्न जागेवरच मार्गी लावले. नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या सोडवण्यावर भर देण्यात आला. बारामतीतील नागरिकांच्या समस्या जलदगतीने सोडवण्यासाठी दर आठवड्याच्या प्रत्येक गुरुवारी श्री जय अजितदादा पवार जनता दरबाराच्या माध्यमातून नागरिकांना भेटणार आहेत.



### सलग 15 वर्षे 100% निकालाची सुवर्ण परंपरा कायम

■ शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्यु. कॉलेज सासवडचे दैदिप्यमान यश!


सासवड (दैनिक संध्या) : श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सासवड या विद्यालयाने इयत्ता १२ वी उच्च माध्यमिक (HSC) परीक्षा २०२५-२६ मध्ये १००% निकाल मिळवत सलग १५ व्या वर्षीही यशाची परंपरा कायम राखली आहे. यंदा एकूण १०५ विद्यार्थी (४५ मुले व ६० मुली) परीक्षेला बसले होते आणि सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. निकालामध्ये ५ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य , २३ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, ७० विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी तर ७ विद्यार्थ्यांनी तृतीय श्रेणी मिळवली आहे. गुणक्रमातील अव्वल विद्यार्थी: १) कु. श्रेया दीपक जगताप – ९०.००% २) कु. अलिना जुबेर बागवान – ८०.००% ३) कु. सिद्धार्थ मंगेश एरंडे – ७७.३३% या उल्लेखनीय यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य तसेच संस्थेच्या व्यवस्थापनाचे सक्षम नेतृत्व महत्त्वाचे ठरले आहे. या यशाबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती रेणुका सिंग मॅडम, उपप्राचार्या सुषमा रासकर मॅडम ज्यु. कॉलेज विभाग प्रमुख उज्वला जगताप मॅडम तसेच श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व अधिकारी व पदाधिकारी यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. विद्यालयाची ही यशस्वी परंपरा पुढील काळातही अशीच कायम राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### डॉ. कल्पना पोकळे यांच्या 'ओम श्री क्लिनिक'मध्ये दिवसाढवळ्या धाडसी चोरी

■ २ लाख ६० हजारांचे सोन्याचे दागिने व रोकड लंपास; कवठे येमाई परिसरात खळबळ

कवठे येमाई (दैनिक संध्या): शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथे माजी पंचायत समिती सदस्या डॉ. कल्पना सुभाष पोकळे यांच्या गावठाणात असलेल्या 'ओम श्री क्लिनिक'मध्ये भरदिवसा धाडसी चोरी झाल्याची घटना समोर आली आहे.अज्ञात चोरट्याने दवाखान्यात शिरून अंदाजे २ लाख ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोकड लंपास केल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. शिरूर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी दि.२ ला दुपारच्या सुमारास ही घटना घडली. डॉ. कल्पना पोकळे यांचा कवठे येमाई येथे 'ओम श्री क्लिनिक' नावाने दवाखाना आहे. दवाखान्याचा दरवाजा उघडा असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला. त्यानंतर टेबल खाली ठेवलेली पर्स चोरून नेली. त्या पर्समध्ये सोन्याची अंगठी, बांगडी, गंठण, मणीमंगळसूत्र तसेच दोन हजार रुपयांची रोकड होती. काही वेळानंतर पर्स आढळून न आल्याने चोरीचा प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. डॉ. पोकळे यांनी तात्काळ शिरूर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे. भरदिवसा दवाखान्यासारख्या गर्दीच्या ठिकाणी चोरीची घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.परिसरातील व्यापारी व नागरिकांनी पोलिसांनी गस्त वाढवून अशा घटनांवर आळा घालावाअशी मागणी केली आहे.

### महाळुंगे इंगळे येथे शनिवारी " माझे कविता जन्माख्यान " काव्यसंग्रहाचे प्रकाशन



चाकण (दैनिक संध्या) : खेड तालुक्यातील महाळुंगे इंगळे येथे शनिवारी (दि.९ मे) " माझे कविता जन्माख्यान " या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात येणार आहे, अशी माहिती शामराव पवार व सत्यभामा पवार यांनी दिली. श्याम पवार यांनी हा काव्यसंग्रह लिहिला आहे. महाळुंगे इंगळे येथील स्कोडा कंपनी जवळील न्यू पॅराडाईज बँक्वेट्स अँड लॉन्स मध्ये शनिवारी सायंकाळी साडेपाच वाजता या काव्यसंग्रहाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. वेदांताचार्य डॉ. नारायण महाराज जाधव हे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष आमदार वामनराव चटप, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्डाच्या माजी अध्यक्षा डॉ. शकुंतला काळे उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी पार्श्वगायक अवधूत गांधी यांचे सुश्राव्य गायन होणार आहे. या कार्यक्रमाचा नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन लाभ घेण्याचे आवाहन सत्यभामा पवार, महादेव बोत्रे, संजीव गव्हाणे, सुहास मोरे, प्रज्ञा बोत्रे, धनश्री गव्हाणे व स्मिता मोरे आदींनी केले आहे.

### खालुंब्रे येथे शुक्रवारी ग्रामसभा



चाकण (दैनिक संध्या) : खेड तालुक्यातील खालुंब्रे येथे शुक्रवारी (दि.८) ग्रामपंचायतीच्या वतीने मारुती मंदिरात सकाळी साडेदहा वाजता सर्वसाधारण ग्रामसभा आयोजित करण्यात आली आहे. गावातील सर्व मतदारांनी व ग्रामस्थांनी या ग्रामसभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन ग्रामपंचायत अधिकारी एस.डी. नाईकडे व प्रशासक एस.एस. साळुंके यांनी केले आहे.

# चाकण येथील श्री भैरवनाथ महाराजांच्या यात्रेची उत्साहात सांगता

**नामांकित मल्लांनी गाजवला कुस्त्यांचा आखाडा**



चाकण (दै. संध्या)

समस्त ग्रामस्थ मंडळी चाकण व श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने चाकण येथे सलग तीन दिवस सुरू असलेल्या श्री भैरवनाथ महाराजांच्या यात्रेची उत्साहात सांगता करण्यात आली. या उत्सवानिमित्त पालखी मिरवणूक, छबिना, सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल व भव्य बैलगाडा शर्यत आयोजित करण्यात आल्या होत्या. विजेत्या बैलगाडा मालकास जाहीर करण्यात आल्याप्रमाणे रोख ३ लाख, ०४ हजार, ७७६ रुपये इनाम विभागून देण्यात आला.

श्री भैरवनाथ महाराजांच्या उत्सवाच्या दिवशी पहाटे पाच वाजता श्री भैरवनाथ महाराजांचा अभिषेक व पूजा करण्यात आली. त्यानंतर हारतुरे, मांडव डहाळे, पालखी, छबिना व वाद्यवृंदाच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. चाकण नगर परिषदेसमोर मोठी आतषबाजी करण्यात आली. बैलगाडा शर्यतीत प्रथम क्रमांकाच्या विजेत्या बैलगाडा मालकास रोख १,११,१११ रुपये, तसेच यातील फळीफोड गाड्यास रोख ११ हजार रुपये देण्यात आले. द्वितीय क्रमांकास रोख ७७,७७७ रुपये तसेच यातील फळीफोड गाड्यास रोख ७,००० रुपये देण्यात आले. तृतीय क्रमांकास रोख ५५,५५५ रुपये व यातील फळीफोड गाड्यास रोख ६,००० रुपये देण्यात आले. चतुर्थ क्रमांकास रोख ३१,३३३ रुपये व यातील फळीफोड गाड्यास रोख ५,००० रुपये देण्यात आले. एक नंबरमधील बारीस रोख दोन हजार रुपये, दोन नंबरमधील बारीस पंधराशे रुपये, तर तिसऱ्या क्रमांकामधील बारीस एक हजार रुपये आणि चौथ्या क्रमांकाच्या बारीस पाचशे रुपये देण्यात आले.

करमणुकीसाठी हिंदवी पाटील प्रस्तुत " हिऱ्याची हिरकणी, नादखुळा व मदनाची मंजिरी " हा बहारदार लावण्यांचा कार्यक्रम संपन्न झाला. कुस्त्यांच्या आखाड्यात विजेत्या पैलवानांना जाहीर करण्यात आल्याप्रमाणे रोख १०१ ते १ लाख रुपयांपर्यंत इनाम देण्यात आला. महाराष्ट्र चॅम्पियन पै. सुभोद पाटील व पै. महारुद्र काळेल यांच्यात जंगी सामना रंगला. महाराष्ट्र केसरी पै. विजय उर्फ विकी बनकर आणि ग्रीको रोमन महाराष्ट्र केसरी पै. दिग्विजय भोंडवे यांनी आखाड्याला सदिच्छा भेटी देऊन ग्रामस्थ व पैलवानांचे कौतुक केले. समस्त ग्रामस्थ मंडळी चाकण व श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने या सर्व कार्यक्रमांचे आयोजन केले होते, असे यात्रा कमिटीचे अध्यक्ष किसनराव गोरे यांनी सांगितले.

## बालकांवरील अत्याचार प्रकरणांचा चाकण भागात निषेध

**नराधमांना फाशी देण्याची मागणी**

चाकण (दै. संध्या)

अल्पवयीन मुलाने अवघ्या तीन वर्षांच्या मुलावर अनैसर्गिक अत्याचार करून गळा चिरून खून केल्याचा धक्कादायक प्रकार खेड तालुक्यातील खालुंब्रे येथे उघडकीस आला. नसरापूर येथे सुट्टीसाठी आलेल्या चिमुकलीवर अत्याचार करून निघरून खून झाला. तसेच हिंजवडी येथे एका उच्चभ्रू सोसायटी मधील एका सुरक्षारक्षकाने नऊ वर्षीय मुलीसोबत अश्लील चाळे केल्याच्या संतापजनक घटनांच्या निषेधार्थ खालुंब्रे ग्रामस्थांकडून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत. संबंधित नराधमांना तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी जोरदार मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस विशाल तुळवे यांनी केली आहे.

खालुंब्रे येथे तीन वर्षाच्या बालकावर अमानुष अत्याचार करून हत्या करण्यात आल्याची घटना घडली. तसेच नसरापूर येथे एका चिमुकल्या मुलीवर अत्याचार करून खून करण्यात आला. त्यामुळे या परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या अशा प्रकारच्या अमानुष गुन्ह्यांवर आळा बसविण्यासाठी नराधमांना कोणतीही दया न दाखवता तात्काळ कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी ठाम भूमिका विशाल तुळवे यांनी घेतली आहे. अशा धक्कादायक घटना रोखण्यासाठी राज्य शासनाने कायद्यात अधिक कठोर तरतुदी करून स्वतंत्र कायदा लागू केला पाहिजे.

गंभीर गुन्ह्यांमध्ये तातडीने आणि कठोर शिक्षा झाली तरच समाजात कायद्याबद्दल विश्वास निर्माण होईल. अन्यथा भीतीचे वातावरण वाढण्याची शक्यता आहे. शासनाने अशा धक्कादायक प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन त्यावर तातडीने कारवाई केली पाहिजे.

> "खालुंब्रे येथील निष्पाप बालकावरील अत्याचार हा मानवतेचा खूप मोठा अपमान आहे. नराधमांना कोणती तयारी न दाखवता तातडीने फाशीची शिक्षा द्यावी. भविष्यात अशा धक्कादायक घटना टाळण्यासाठी कठोर कायदा लागू करणे अत्यंत आवश्यक आहे."
> **- विशाल तुळवे, जिल्हा सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस,.**

## परप्रांतीय गेले गावाला...

नारायणगाव (दै. संध्या)

राज्यात सुरू असलेल्या खाजगी व सरकारी बांधकामांना मजूर टंचाईमुळे सध्या मोठा अडथळा निर्माण झाला आहे. केरळ,तामिळनाडू आसाम, पश्चिम बंगाल,पोंडेचेरी, या राज्यातील विधानसभा निवडणुका आणि सणामुळे परप्रांतीय कामगार मोठ्या प्रमाणात मूळ गावी परतले आहेत.

त्यामुळे बांधकाम क्षेत्राला मोठा फटका बसल्याचे दिसून येत आहे.त्यामुळे परप्रांतीय गेले गावाला आग लागली कामांना अशी म्हणण्याची वेळ शहरासह ग्रामीण भागातही आली आहे. दिवाळीनंतर उन्हाळ्याच्या काळात संपूर्ण राज्यात मोठ्या प्रमाणावर बांधकामे सुरू असतात.ही कामे करण्यासाठी परप्रांतीय मोठ्या प्रमाणावर असतात परंतु सध्या कामगारांची कमतरता जाणवत आहे.

निवडणूक प्रचार व मतदानासाठी स्थानिक नेते व कार्यकर्त्यांनी कामगारांना गावी बोलावल्याने अनेक कामगार महिनाभरापासूनच गैरहजर आहेत.

कामगारांना प्रचारासाठी दररोज हजार रुपये आणि मतदान करण्यासाठी 2000 रुपये मिळत असल्याने तसेच प्रवासाचा खर्चही दिला जात असल्याने ते गावी गेल्याचे कामगारांनी सांगितले. राज्यातील मतदान प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

## लग्नसराईत उन्हाचा पारा ४०

नारायणगाव (दै. संध्या)

पुणे जिल्ह्यात उन्हाचा पारा 40अंशाच्या वर गेल्याने यावर्षी लग्नात वऱ्हाडी मंडळी हैराण झाली आहेत.उन्हाची तीव्रता आणि लग्नसराईच्या धावपळीमुळे नातेवाईकांची मोठी तारांबळ उडाली असून भर उन्हात लग्न सोहळ्यांना हजेरी लावणे नातेवाईकांसाठी जिकीरीचे ठरत आहे.दुपारी साडेबारा ते अडीच या वेळेत असणाऱ्या मुहूर्तामुळे महिला आणि इतर पाहुण्यांना उन्हाचा मोठा तडाखा सहन करावा लागत आहे. जुन्नरमधील पश्चिम पट्टा आणि आणे पठार भागात पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असतानाच एकाच दिवशी अनेक लग्न असल्याने नातेवाईकांची कसरत होत आहे. मंगल कार्यालयांमध्ये जेवणासाठी ताटकळत उभे रहावे लागणे आणि थंड पेय,उसाचा रस आणि पाण्यासाठी पाहुण्यांची वणवन सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. त्यातच लग्न सोहळ्यात नवरा नवरी सोबत फोटो काढण्याच्या सेल्फ क्रेझमुळे आणि कॅमेऱ्याच्या फोकस लॅम्पच्या उष्णतेमुळे वधूवरांनाही उकाड्याचा त्रास सहन करावा लागत आहे. या उन्हाच्या तडाख्यात लग्न मंडपात उपस्थित नातेवाईकांना पुढारी,नेते मंडळींच्या लांबलचक भाषणांचाही सामना करावा लागत आहे.

## सरपंच जोरी यांच्याविरोधात अविश्वास ठराव मंजूर

*ग्रामपंचायतीच्या इतिहासातील पहिलीच घटना; जांबुत मध्ये राजकीय वातावरण तापले*

कवठे येमाई (दै. संध्या)





शिरूर तालुक्यातील जांबुत ग्रामपंचायतीचे सरपंच दत्तात्रय रामचंद्र जोरी यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेला अविश्वास ठराव सोमवारी झालेल्या विशेष सभेत बहुमताने मंजूर करण्यात आला. ग्रामपंचायत स्थापनेपासून प्रथमच अशा प्रकारचा अविश्वास ठराव मंजूर झाल्याने गावातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. ग्रामपंचायत कार्यालयात सकाळी अकरा वाजता ही विशेष सभा पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के होते. सभेसाठी ग्रामपंचायतीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरपंच दत्तात्रय जोरी यांच्या कार्यपद्धतीबाबत काही सदस्यांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. विकासकामांमध्ये होत असलेला विलंब, प्रशासकीय निर्णय प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव, तसेच सदस्यांना विश्वासात न घेता घेतले जाणारे निर्णय या मुद्द्यांवरून सदस्यांनी तीव्र अ समाधान व्यक्त केले. याच पार्श्वभूमीवर सरपंचांविरोधात अविश्वास ठराव दाखल करण्यात आला होता.

सभेदरम्यान सदस्यांमध्ये विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. काही सदस्यांनी ग्रामपंचायतीतील कामकाजाबाबत नाराजी व्यक्त करताना गावाच्या विकासासाठी सक्षम नेतृत्वाची आवश्यकता असल्याचे मत मांडले. त्यानंतर घेण्यात आलेल्या मतदान प्रक्रियेत बहुसंख्य सदस्यांनी अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान केले. त्यामुळे ठराव अधिकृतपणे मंजूर करण्यात आला.

दरम्यान, या घडामोडीनंतर जांबुत ग्रामपंचायतीत पुढील राजकीय समीकरणांना वेग येणार असल्याची चर्चा गावात सुरू झाली आहे. नवीन सरपंच निवडीसाठी लवकरच प्रक्रिया पार पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## शिरूरमध्ये वारंवार वीज खंडित; नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये संताप

कमी व्होल्टेज आणि अतिरिक्त भारामुळे समस्या तीव्र; महावितरणकडे निवेदन

कवठे येमाई (दै. संध्या)





शिरूर शहरातील मारुती आळी,सरदार पेठ तसेच रामलिंग रस्ता परिसरातील अनेक सोसायट्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिक आणि व्यापारी वर्ग प्रचंड त्रस्त झाला आहे. वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर सतत खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असून महावितरण प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला जात आहे.

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित भागातील विद्युत रोहित्रांवर अतिरिक्त भार पडत असल्याने कमी व्होल्टेज, फेज जाणे आणि वारंवार वीज खंडित होणे अशा समस्या निर्माण होत आहेत. परिणामी घरगुती वापरासोबतच व्यावसायिक आस्थापना, दवाखाने, लिफ्ट, मोटारी तसेच बाजारपेठेतील विविध उपकरणांच्या कामकाजावर परिणाम होत आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांत विजेचा वापर वाढल्याने सध्याची यंत्रणा अपुरी पडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना उकाड्यामुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येबाबत परिसरातील वीज ग्राहकांनी महावितरण कार्यालयाला निवेदन दिले असून संबंधित भागातील रोहित्रांची क्षमता तातडीने वाढवावी, कमी व्होल्टेज चा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा आणि नियमित वीज पुरवठा सुरळीत करावा,अशी मागणी करण्यात आली आहे.महावितरण प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन योग्य उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा विनीत बोरा, सागर चव्हाण, राजेंद्र लोढा व इतर स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

## नसरापूर अत्याचार प्रकरणाच्या निषेधार्थ शिरूर पेटले

शिरूर (दै. संध्या)

नसरापूर येथे घडलेल्या अमानुष लैंगिक अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ शिरूर शहरात संतापाची तीव्र लाट उसळली आहे. आरोपीस कठोरातील कठोर शिक्षा व्हावी, तसेच प्रकरणाची सुनावणी फास्टट्रॅक न्यायालयात करण्यात यावी, अशी ठाम मागणी शिरूरकरांच्या वतीने करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर विविध सामाजिक, राजकीय व नागरिक संघटनांच्या प्रतिनिधींनी शिरूर पोलीस ठाण्यात जाऊन पोलीस निरीक्षक संदेश केंजळे व नायब तहसीलदार प्रकाश मुसळे यांना निवेदन सादर केले.

यावेळी नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे, उपनगराध्यक्ष मितेश गादिया, नगरसेवक रवी उर्फ शाम मनोहर ढोबळे, नगरसेविका आयेशा सय्यद, संगिता मल्लाव, शोभना पाचंगे, शशिकला काळे, प्रिया बिरादार, सविता बोरुडे, उषा वाखारे, बापु सानप, डॉ. संतोष पोटे, प्रितेश फुलडाळे, योगेश जामदार यांसह अनेक महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच पीडितेला न्याय मिळण्यासाठी न्यायप्रक्रिया वेगाने पूर्ण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## चाकण - शिक्रापूर रस्ता बनलाय मृत्यूचा सापळा : दुरुस्तीचे काम अडकले लालफितीत

चाकण (दै. संध्या)

वाहतूक कोंडीच्या विळख्यात अडकलेला चाकण शिक्रापूर रस्ता मृत्यूचा सापळा बनत चालला आहे. ओव्हरटेकच्या प्रयत्नात या रस्त्यावर दररोज एक ना एक अपघात होत असल्याने अनेकांचे नाहक बळी गेले आहेत.

दोनच दिवसांपूर्वी या रस्त्यावर भोसे गावच्या हद्दीत भर दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास कंटेनरने समोरून येणाऱ्या मोटारीसह एका टेम्पोला जबरदस्त धडक दिली. या अपघातात मोटर व टेम्पोचे प्रचंड नुकसान झाले असून टेम्पोचालक गंभीर जखमी झाला आहे. मोटारीचे एक चाक निखळून पडले तर दुसऱ्या टेम्पोच्या केबिनमध्ये अडकलेल्या चालकास स्थानिकांनी मोठ्या शर्तीने बाहेर काढले. जखमींना रुग्णवाहिकेतून रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. चाकण - शिक्रापूर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम लालफितीत अडकले असून, दुरुस्तीच्या कामाला अद्याप मुहूर्त मिळाला नसल्याने अपघाताचा सिलसिला सुरूच राहिला आहे.

चाकण पासून पुढे शिक्रापूर मार्गाकडे निघाल्यानंतर भोसे येथील प्राथमिक शाळेजवळील व शेलपिंपळगाव येथील नदीवरील धोकादायक वळण अपघाताला निमंत्रण देत आहे. बहूळ, साबळेवाडी हद्दीतील नागमोडी वळणावर ओव्हरटेकच्या प्रयत्नात छोटे मोठे अपघात झाले असून, अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. रस्त्यालगतच्या साईड पट्ट्या खचल्या असून मध्यभागी खड्डे पडले आहेत. गेल्याच वर्षी या रस्त्यावर एका भरधाव कंटेनरची दहा ते बारा वाहनांना धडक बसल्याने अनेक नागरिक गंभीर जखमी झाले होते. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या एका निष्पाप चिमुरडीला उपचाराशी झुंज देताना आपला जीव गमवावा लागला.



## थोडक्यात पण महत्वाचे...



### शासकीय कर्मचाऱ्यांसाठी हिंदी भाषा परीक्षा स्थगित : डॉ. उदय सामंत

मुंबई (दैनिक संध्या) : शासकीय कर्मचाऱ्यांसाठी हिंदी भाषा परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी जाहीर केला आहे. मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांनी स्पष्ट केले की, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपूर्वी तत्कालीन मुंबई सरकारने शासकीय पत्रव्यवहार व माहितीची देवाणघेवाण सुलभ होण्यासाठी कर्मचाऱ्यांना हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य केले होते. मात्र, राज्य स्थापन झाल्यानंतर मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळाला असून, १ मे, १९६६ पासून वर्जित प्रयोजनांव्यतिरिक्त सर्वच शासकीय कामकाज मराठीतच करण्यात येत आहे. त्यामुळे, सध्याच्या परिस्थितीत हिंदीचा वापर फारसा होत नसल्याने, शासकीय कर्मचाऱ्यांसाठी व अधिकाऱ्यांसाठी हिंदी भाषा परीक्षा सुरू ठेवणे संयुक्तिक ठरत नाही, असे त्यांनी नमूद केले. यासंदर्भात शासन स्तरावर चर्चा सुरू असून भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी हिंदी भाषा परीक्षा रद्द करण्याची मागणी मराठी भाषा विभागाकडे करण्यात आली होती. या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरू असून, अंतिम धोरणात्मक निर्णय लवकरच घेतला जाणार आहे. अंतिम निर्णय होईपर्यंत भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी हिंदी भाषा परीक्षा स्थगित करण्यात येत असल्याचे भाषा संचालक अरूण गिते यांनी कळविले आहे.




### 'स्व-गणना' प्रक्रियेसाठी कर्मचाऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन

मुंबई (दैनिक संध्या) : भारत सरकारच्या जनगणना २०२७ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या स्व-गणना प्रक्रियेत राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन सामान्य प्रशासन विभागामार्फत करण्यात आले आहे. जनगणना दोन टप्प्यात आयोजित करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात घरांची यादी आणि घरगणना करण्यात येणार आहे, तर दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्येची गणना करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्यात पहिल्या टप्प्यातील कामकाज १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाज सुरू होण्यापूर्वी १ मे २०२६ ते १५ मे २०२६ दरम्यान नागरिकांसाठी स्व-गणनेचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या डिजिटल इंडिया उपक्रमाच्या अनुषंगाने या जनगणनेत आधुनिक तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करण्यात येणार असून नागरिकांना https://se.census.gov.in या पोर्टलद्वारे स्व-गणना करता येणार आहे. यामुळे माहिती संकलनाची गुणवत्ता, कार्यक्षमता आणि वेळेची अचूकता वाढण्यास मदत होणार आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या प्रक्रियेत सहभागी व्हावे जेणेकरून केंद्र शासनाच्या अन्य उपक्रमाप्रमाणेच डिजिटल इंडिया उपक्रमामध्ये महाराष्ट्र अग्रेसर राहील यासाठी शासनाच्या सर्व कार्यालयांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन सामान्य प्रशासन विभागामार्फत करण्यात आले आहे.

### नागपूर येथे अत्याधुनिक बाष्पके प्रशिक्षण केंद्र उभारणीस गती देणार

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील औद्योगिक क्षेत्र अधिक सुरक्षित, सक्षम आणि कौशल्याधारित बनविण्याच्या दृष्टीने नागपूर येथे अत्याधुनिक बाष्पके (बॉयलर) प्रशिक्षण केंद्र उभारण्याच्या प्रक्रियेला गती देण्यात येणार असल्याची माहिती राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी दिली. बाष्पके विभागामार्फत कौशल्यविकास प्रशिक्षण आयोजित करण्यासंदर्भात मंत्रालयात आयोजित महत्त्वपूर्ण बैठकीत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. बैठकीत बाष्पके संचालनालयाचे बळकटीकरण, कायद्याची प्रभावी अंमलबजावणी तसेच प्रशिक्षण व्यवस्थेचा विस्तार याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. बाष्पके संचालनालयामार्फत दरवर्षी बाष्पक निर्माते, वापरकर्ते, अभियंते, बाष्पक प्रचालन अभियंते आणि बाष्पक परिचर यांच्यासाठी बाष्पकाचा सुरक्षित व कार्यक्षम वापर याबाबत जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. या अंतर्गत विविध चर्चासत्रे, तांत्रिक मार्गदर्शन सत्रे तसेच औद्योगिक सुरक्षिततेविषयी प्रशिक्षण दिले जाते. तसेच संचालनालयामार्फत दरवर्षी बाष्पक परिचर क्षमता प्रमाणपत्र परीक्षा व बाष्पक प्रचालन अभियंता नैपुण्य प्रमाणपत्र परीक्षा आयोजित करण्यात येत असून, उद्योग क्षेत्रासाठी प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याचे महत्वपूर्ण कार्य करण्यात येत आहे. यावेळी नागपूर येथे सहसंचालक, बाष्पके संचालनालय यांच्या स्तरावर प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला. प्रस्तावित केंद्रात प्रथम व द्वितीय श्रेणी बाष्पक परिचरांसाठी रिफ्रेशर कोर्स, बाष्पक प्रचालन अभियंत्यांसाठी रिफ्रेशर कोर्स, आय.बी.आर. वेल्डर सर्टिफिकेशन कोर्स तसेच इंसुलेशन व रिफ्रॅक्टरी विषयक विशेष प्रशिक्षण अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहेत. या माध्यमातून विदर्भासह राज्यातील युवकांना रोजगाराभिमुख तांत्रिक प्रशिक्षणाची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. बैठकीत राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी नागपूर येथे प्रस्तावित इमारतीच्या बांधकामाचा दर्जा, आराखडा आणि प्रशिक्षण सुविधांबाबत सविस्तर माहिती घेण्याच्या सूचना दिल्या. इमारतीच्या बांधकामादरम्यान फायर सेफ्टी ऑडिट अनिवार्यपणे करण्याचे निर्देश देत सुरक्षिततेच्या सर्व निकषांचे काटेकोर पालन करण्यावर त्यांनी भर दिला.

### कर्ज योजनेची मर्यादा वाढविण्यासाठी प्रस्ताव तयार करा



मुंबई (दैनिक संध्या) : दिव्यांगांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी कर्ज योजनांची व्याप्ती वाढविणे आवश्यक आहे. राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कर्ज वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करून इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या व्याज परतावा योजनेच्या धर्तीवर वैयक्तिक थेट कर्ज योजनेअंतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांना कर्ज मर्यादा वाढविण्यासाठी सविस्तर प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.



# ९ देशी कट्टे, ५ मॅगझिन आणि ४६ जिवंत काडतुसांसह चौघांना अटक

**पिंपरी (दै. संध्या)**

**पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई**

देहूरोड परिसरात व्यापाऱ्यावर झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी अवैध शस्त्रांविरोधात व्यापक मोहीम हाती घेतली असून, गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत चार आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत तब्बल ८ लाख रुपये किमतीचा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. गुन्हे शाखा युनिट १ च्या पथकाने केलेल्या या कारवाईत आरोपींकडून ९ देशी कट्टे, ५ मॅगझिन आणि ४६ जिवंत काडतुसे असा मोठा साठा हस्तगत करण्यात आला. तसेच, दोन वाहनेही पोलिसांनी जप्त केली आहेत.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अब्दुलहमीद शेख (वय ३०, रा. महाराष्ट्र कॉलनी, येरवडा), वैभव अडसूळ (वय ३१, रा. काळेवाडी, पुणे), सौरभ लाड (वय २६, रा. पाषाण) आणि अजयराज कांबळे (वय ३२, रा. पाषाण) यांचा समावेश आहे.

पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी अवैध अग्निशस्त्रांविरोधात कडक कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार गुन्हे शाखा युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेंद्र ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तपास करत होते. यावेळी उपनिरीक्षक शिवानंद स्वामी यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही यशस्वी कारवाई करण्यात आली.

या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात आर्म अॅक्ट व महाराष्ट्र पोलीस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुळीग पुढील तपास करत आहेत. पोलिस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने केलेली ही कारवाई शहरातील अवैध शस्त्रसाठ्यावर मोठा आळा घालणारी ठरली आहे.

## टीबी मुक्त भारत अभियानात सहभागी होण्याची सूचना

**मुंबई (दै. संध्या)**

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी क्रीडा विभाग, क्रीडा व युवक कल्याण आयुक्त, एनसीसी महाराष्ट्र, माय भारत, महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस व गाईडस आदी संस्थांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची लोक भवन येथे बैठक घेऊन सर्व संस्थांना राज्यातील टीबी मुक्त भारत अभियानात सहभागी होण्याची सूचना केली.

राज्यात एनसीसीचे १.२१ लाख कॅडेट्स, १७ लाख स्काऊट्स व गाईड्स तसेच माय भारत उपक्रमात १३.५० लाख युवा स्वयंसेवक असून ते सर्व टीबी मुक्त भारत अभियानात सहभागी झाल्यास अभियान राज्यात यशस्वी होईल असे राज्यपालांनी सांगितले. यावेळी अधिकाधिक युवकांना निक्षयमित्र बनवण्याची देखील सूचना राज्यपालांनी केली. क्रीडा विभागाने आंतरराष्ट्रीय क्रीडाप्रकारांशिवाय राज्यातील पारंपरिक क्रीडा प्रकारांना चालना द्यावी अशी सूचना राज्यपालांनी विभागाला केली. यावेळी राज्यपालांनी महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट – गाईड संस्थेला राज्यात स्काऊट गाईडचे राष्ट्रीय शिबीर (जांबोरी) आयोजित करावे. स्काऊट व गाईड चळवळीमध्ये नवचैतन्य देण्यासाठी आकर्षक प्रशिक्षण कार्यक्रम आखावा अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली.

## महालक्ष्मी सरसमध्ये चंद्रपूरच्या चित्रा बोरुडे यांची कमाल

**मुंबई (दै. संध्या)**

महालक्ष्मी सरस २०२६ मध्ये राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या महिला उद्योजकांनी आपल्या भागातील पारंपरिक चवी मुंबईकरांसमोर मांडल्या आहेत. हस्तकला, ग्रामीण उत्पादने आणि खाद्यसंस्कृती यांचा सुंदर संगम या मेळ्यात पाहायला मिळत आहे. यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील मेंडकी गावच्या चित्रा विशाल बोरुडे यांनी सादर केलेल्या तब्बल ३५ प्रकारच्या लोणच्यांनी ग्राहकांचे विशेष लक्ष वेधून घेतले आहे.




लॉकडाऊनच्या काळात चित्रा बोरुडे यांच्या कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले. त्यांचे पती कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करत होते; मात्र लॉकडाऊनमध्ये त्यांचं काम पूर्णपणे बंद पडलं. घरात दोन मुलांचे शिक्षण, दैनंदिन खर्च आणि इतर जबाबदाऱ्या वाढू लागल्या. घर चालवण्यासाठी चित्रा आणि त्यांचे कुटुंब शेतात मजुरी करू लागले. मात्र दिवसभर काम करूनही केवळ १५० ते २०० रुपये मिळत असल्याने त्यातून घरखर्च भागवणे कठीण होत होते.

या काळात चित्रा बोरुडे यांनी घरच्या घरी काहीतरी नवीन करण्याचा विचार केला. त्यांच्या घराच्या आजूबाजूला आंब्याची झाडं होती. त्यावेळी त्यांच्या मनात विचार आला की, आपल्याकडे चांगल्या दर्जाचे आंबे आहेत, तर एकदा लोणचं करून पाहूया.

आपल्याला लोणचं व्यवस्थित बनवता येतं का, त्याची चव लोकांना आवडते का, हे पाहण्यासाठी त्यांनी २०२० मध्ये सर्वप्रथम कैरीचं लोणचं तयार केलं.

घरच्या घरी बनवलेलं हे लोणचं त्यांनी सुरुवातीला गावात विकायला नेलं. गावातील लोकांना त्याची चव आवडली आणि त्याला चांगला प्रतिसाद मिळू लागला. त्यानंतर त्यांनी तालुका पातळीवरही विक्री सुरू केली. हळूहळू ग्राहक वाढत गेले आणि त्यांच्या लोणच्यांची ओळख निर्माण होऊ लागली.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सेवानिवृत्तांचे धरणे आंदोलन; दोन महिन्यांपासून पेन्शन बंद

**पुणे (दै. संध्या)**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (म.जी.प्रा.) मधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मागील दोन महिन्यांपासून निवृत्ती वेतन मिळाले नसल्यामुळे राज्यभर संतापाची लाट उसळली असून आज पुण्यात धरणे आंदोलन करण्यात आले. भीषण उन्हाळ्यात वयोवृद्ध कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ येत असल्याने तात्काळ पेन्शन तत्काळ सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

म.जी.प्रा. कर्मचारी संघर्ष कृती समितीच्या वतीने राज्यातील सर्व कार्यालयांसमोर आंदोलन करण्यात आले. या वेळी शासनाकडे निवेदन सादर करून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी करण्यात आली. हे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत पाठविण्यात आले आहे.



तसेच म.जी.प्रा. च्या मुकह्या अभियंता वैशाली आवटे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष एस. डी. देशपांडे, उपाध्यक्ष स. सी. आलेकर , कार्याध्यक्ष ए. जी. देशमुख, अरुण निर्भवणे, गजानन गटलेवार, ए. जी. देशमुख, सरचिटणीस संजय केळकर, डी . के. इनामदार, प्रिया माळी, श्रीकांत राऊत यांच्यासह शेकडो निवृत्त कर्मचारी , अभियंते उपस्थित होते.

संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, महालेखाकार कार्यालयाने लेखाशीर्ष गोठविल्यामुळे मार्च २०२६ पासून सेवानिवृत्ती वेतन देणे थांबवले आहे. तसेच वेतनासाठी वापरण्यात येणाऱ्या तात्पुरत्या कोडची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी संपल्याने पुढील वेतन वितरण अशक्य झाल्याचे सांगण्यात आले आहे. यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिक आर्थिक संकटात सापडले असून त्यांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. औषधोपचारांसाठीही पैसे उपलब्ध नसल्याने अनेकांची प्रकृती खालावत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.


संघटनेने नमूद केले की, २३ मार्च २०१७ रोजी शासनाने म.जी. प्रा. कर्मचाऱ्यांना शासकीय दर्जा देऊन त्यांच्या वेतन व निवृत्ती वेतनाची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, त्या निर्णयाची अंमलबजावणी अद्याप पूर्णपणे झालेली नाही.

या पार्श्वभूमीवर, शासनाने तातडीने निर्णय घेऊन प्रलंबित बाबी मार्गी लावाव्यात आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्वरित पेन्शन अदा करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. म.जी.प्रा. कर्मचारी संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष अरुण निर्भवणे व सरचिटणीस गजानन गटलेवार यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत, मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही दिला आहे.

## माधुरी दीक्षितसोबत सर्वाइकल कॅन्सर जागरूकता उपक्रम सुरू

**पुणे (दै. संध्या)**

एमएसडी (ज्याला युनायटेड स्टेट्स आणि कॅनडामध्ये मर्क एंड कंपनी, इंक., रहवे, एन.जे., यूएसए म्हणून ओळखले जाते) यांनी आज भारतात आपल्या सर्वाइकल कॅन्सर जागरूकता मोहिमेची सुरुवात जाहीर केली. हा उपक्रम प्रसिद्ध अभिनेत्री, सार्वजनिक व्यक्तिमत्त्व आणि आई माधुरी दीक्षित नेने यांच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा उद्देश महिलांच्या प्रतिबंधात्मक आरोग्याविषयीच्या चर्चांना पुढे आणणे आणि देशभरातील महिला व पालकांना सर्वाइकल कॅन्सर आणि त्याच्या प्रतिबंधासाठी उपलब्ध असलेल्या योग्य आरोग्य पर्यायांविषयी डॉक्टरांशी चर्चा करण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे. सर्वाइकल कॅन्सर हा भारतातील महिलांना प्रभावित करणाऱ्या सर्वात सामान्य कॅन्सरपैकी एक आहे. वेळेवर डॉक्टरांचा सल्ला घेऊन आणि योग्य प्रतिबंधात्मक उपाय केल्यास हा



आजार मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकतो, तरीही भारतात दर सात मिनिटांनी जवळपास एका महिलेचा मृत्यू होतो, म्हणजेच दररोज सुमारे 200 मृत्यू होतात (ग्लोबोकॅन एचपीव्ही इंडिया रिपोर्ट 2023 नुसार डेटा). ही मोहीम विशेषतः महिलांमध्ये जागरूकतेची कमतरता आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा घेण्यास होणारा विलंब या महत्त्वाच्या समस्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करते.

# इयत्ता १०वी व १२वीनंतर विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील कौशल्य विकासाचे महत्त्व

**इयत्ता १० वी आणि १२ वी हे प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचे टप्पे मानले जातात. या टप्प्यानंतर विद्यार्थी आपल्या भविष्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतो. पुढील शिक्षणाची दिशा, करिअरची निवड आणि आयुष्यातील उद्दिष्टांची पायाभरणी याच काळात होते. त्यामुळे या वयात केवळ पुस्तकातील ज्ञानावर अवलंबून न राहता कौशल्य विकासाला प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक ठरते.**




■ लेखक ■
डॉ. विकास संजय निर्मळ
कार्यकारी अधिकारी कृषि उद्योग मूल शिक्षण संस्था, कान्हाटी, बारामती

आजचे युग हे स्पर्धात्मक, तंत्रज्ञानप्रधान आणि वेगाने बदलणारे आहे. अशा परिस्थितीत केवळ गुणांवर आधारित यश मिळवणे कठीण झाले आहे. विद्यार्थ्यांकडे विविध प्रकारची कौशल्ये असणे गरजेचे आहे. संवादकौशल्य, डिजिटल व संगणक कौशल्ये, समस्या सोडवण्याची क्षमता, वेळेचे व्यवस्थापन, नेतृत्वगुण, सर्जनशीलता आणि टीमवर्क ही कौशल्ये विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणातच नव्हे तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उपयोगी पडतात. ही कौशल्ये विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात भर घालतात आणि त्यांना सक्षम व्यक्तिमत्त्व घडवण्यास मदत करतात. १० वी आणि १२ वी नंतर विद्यार्थ्यांसमोर करिअरच्या असंख्य संधी उपलब्ध होतात. विज्ञान, वाणिज्य आणि कला या पारंपरिक शाखांबरोबरच अभियांत्रिकी, वैद्यकीय, औषधशास्त्र, आयटी, व्यवस्थापन, कायदा, कृषी, पॉलिटेक्निक, आयटीआय, एनिमेशन, डिझाईन, हॉटेल मॅनेजमेंट अशा विविध क्षेत्रांमध्ये विद्यार्थी आपली आवड आणि क्षमता ओळखून पुढे जाऊ शकतो. मात्र योग्य करिअरची निवड करण्यासाठी आत्मपरिचय आणि कौशल्यांची जाण असणे अत्यंत आवश्यक आहे. कौशल्य विकासामुळे विद्यार्थी स्वतःची ताकद आणि आवड ओळखू शकतो आणि योग्य दिशेने वाटचाल करू शकतो.

आजच्या औद्योगिकरणात कंपन्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा कौशल्यांना अधिक महत्त्व देताना दिसतात. संगणक ज्ञान, डिजिटल साधनांचा वापर, इंग्रजी संभाषण, सादरीकरण कौशल्य तसेच संघभावना आणि नेतृत्वगुण या गोष्टी रोजगार मिळवण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. कौशल्यपूर्ण विद्यार्थी अधिक सक्षम आणि स्पर्धात्मक बनतो. त्यामुळे त्याला उत्तम नोकरीच्या संधी मिळतात आणि तो आत्मनिर्भर बनतो. कौशल्य विकासामुळे विद्यार्थ्यांना उद्योजकतेकडे वळण्याची प्रेरणा मिळते. आजचा काळ हा नवउद्योजकांचा आहे. विद्यार्थी आपल्या कौशल्यांच्या आधारे लघुउद्योग, सेवा व्यवसाय, ऑनलाइन व्यवसाय किंवा स्टार्टअप सुरू करू शकतो. शेतीपूरक व्यवसाय, डिजिटल सेवा, उत्पादन क्षेत्र, फूड प्रोसेसिंग यांसारख्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत. यामुळे विद्यार्थी केवळ स्वतःचा विकास करत नाही, तर इतरांसाठीही रोजगार निर्माण करतो. "नोकरी मागणारा नव्हे, तर नोकरी देणारा बनणे" ही विचारसरणी कौशल्य विकासातून विकसित होते.

कौशल्य विकास हा व्यक्तिमत्त्व विकासासाठीही अत्यंत आवश्यक आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, निर्णयक्षमता सुधारते आणि समाजात जबाबदारीने वागण्याची जाणीव निर्माण होते. परिणामी तो देशाचा प्रामाणिक व जबाबदार नागरिक बनतो. अशा विद्यार्थ्यांमुळे समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीला गती मिळते.

आज शासनही कौशल्य विकासावर विशेष भर देत आहे. विविध प्रशिक्षण कार्यक्रम, कौशल्य विकास योजना आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधींचा लाभ घेत स्वतःला सक्षम बनवणे आवश्यक आहे.

शेवटी असे म्हणता येईल की, १० वी आणि १२ वी नंतरचा काळ हा विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी आहे. या काळात योग्य दिशा, कौशल्ये आणि सकारात्मक दृष्टिकोन आत्मसात केल्यास विद्यार्थी आपल्या आयुष्यात निश्चितच यशस्वी होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षणाबरोबरच कौशल्य विकासालाही तितकेच महत्त्व द्यावे. कारण आजच्या युगात खऱ्या अर्थाने यशस्वी होण्यासाठी "कौशल्य हेच खरे भांडवल आहे."

## थोडक्यात पण महत्वाचे...




### माऊली पालखी सोहळा पुणे मुक्कामाचा निर्णय 13 मे रोजी आळंदीत

आळंदी (दैनिक संध्या) : संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यात वारकरी व भाविकांना केंद्रस्थानी ठेवून पुण्यातील मुक्कामाबाबत अंतिम निर्णय प्रशासनाच्या लेखी अहवालानंतरच घेतला जाणार आहे. यासाठी १३ मे रोजी आळंदीत दिंडी समाज, फडकरी व मानकरी यांच्यासोबत बैठक होणार असल्याची माहिती पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप व विश्वस्त चैतन्य महाराज कबीर यांनी दिली. पालखी विठोबा मंदिर परिसरात आज जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महापौर मंजुषा नागपुरे, आमदार हेमंत रासने आदींसह संयुक्त पाहणी झाली. यावेळी पुणे महापालिकेकडून ३१ मेपर्यंत मंदिर परिसरातील इमारती ताब्यात घेऊन आवश्यक सुविधा उभारण्याचे आश्वासन देण्यात आले. माऊलींची पालखी ८ जुलैला आळंदीतून प्रस्थान करणार असून ९ व १० जुलैला पुण्यातील भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरात मुक्काम अपेक्षित आहे. मात्र तेथील अपुरी जागा आणि सुविधांबाबत साशंकता व्यक्त करण्यात आली. महिला वारकऱ्यांसाठी विशेष व्यवस्था, अंतर्गत रस्त्यांवर स्वच्छतागृहे, तसेच सुमारे २० जर्मन हँगर मंडप उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, समाधानकारक व्यवस्था न झाल्यास बाबुराव सणस मैदान हा पर्यायही विचाराधीन असल्याचे देवस्थानने स्पष्ट केले. ११ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आणखी एक आढावा बैठक होणार असून, त्यानंतरच अंतिम वेळापत्रक जाहीर होणार आहे.

### बारामती सत्र न्यायालयात आरोपींची निर्दोष मुक्तता

बारामती (दैनिक संध्या) : सत्र प्रकरण क्र. 60/2017 मध्ये माननीय सत्र न्यायालय, बारामती यांनी आरोपी चंद्रकांत भोसले व अरुणा फसगे यांची निर्दोष मुक्तता केली आहे. सदर प्रकरणात अभियोजन पक्षाने भारतीय दंड संहिता कलम 375 व 376(2)(l) अंतर्गत गंभीर आरोप लावले होते. या प्रकरणात सरकार पक्षाने एकूण 11 साक्षीदार तपासले होते. तसेच पीडित ही मतिमंद असल्याने तिच्या साक्षीला न्यायालयाने महत्त्व दिले होते. मात्र, सुनावणीदरम्यान असे आढळून आले की, 11 साक्षीदारांच्या जबाबांमध्ये तसेच तपास अधिकाऱ्यांच्या तपासात गंभीर त्रुटी होत्या. या त्रुटी सुसंगत व प्रभावी स्वरूपात आरोप सिद्ध करण्यासाठी पुरेशा नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. तसेच, DNA अहवाल सकारात्मक (positive) असला तरी तो केवळ शारीरिक संपर्क दर्शवतो. त्यावरून आरोपी क्रमांक 1 यांनी पीडितेसोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले, हे निष्कर्ष काढणे योग्य नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. बचाव पक्षाच्या वतीने मांडण्यात आलेल्या युक्तिवादात खालील महत्त्वाच्या बाबी अधोरेखित करण्यात आल्या. साक्षीदारांच्या जबाबांतील विसंगती तपासातील त्रुटी, वैद्यकीय व तज्ज्ञ पुराव्याचा अभाव, DNA अहवालाची मर्यादा वरील सर्व बाबींचा विचार करून माननीय न्यायालयाने आरोपींना निर्दोष मुक्त करण्याचा निर्णय दिला. सदर प्रकरणात बचाव पक्षाचे कामकाज ॲड. बापूसाहेब शिलवंत यांनी प्रभावीपणे पार पाडले. त्यांना ॲड. रवी अवघडे, ॲड. राहुल गिरमे, ॲड. सागर खरात,ॲड.स्वप्निल खरात तसेच लीगल एडचे मॉनिटर ॲड. पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले.

### आर्थिक सेवा क्षेत्रातील यश मिळवण्यासाठी ज्ञान, चिकाटी आणि योग्य प्लॅटफॉर्मची गरज



पुणे (दैनिक संध्या) : आर्थिक सेवा क्षेत्रातील कारकीर्द अनेकदा एका संधीने सुरू होते; परंतु दीर्घकालीन यश हे ज्ञान, चिकाटी आणि योग्य प्लॅटफॉर्मच्या जोरावरच मिळते. पुणेस्थित वित्तीय सल्लागार रमेश चव्हाण यांचा 'एलआयसी' एजंट ते १२० कोटी रुपयांहून अधिक 'ॲसेट अंडर मॅनेजमेंट' उभारण्यापर्यंतचा प्रवास नेमका हेच दर्शवतो. चव्हाण यांनी १९९७ मध्ये पुण्यात 'एलआयसी' एजंट म्हणून आपल्या व्यावसायिक प्रवासाला सुरुवात केली. त्यांचा विमा क्षेत्रातील प्रवेश अनियोजित होता, तरीही यामुळे त्यांना ग्राहक संबंध आणि आर्थिक सेवांचा मौल्यवान अनुभव मिळाला. सन २००८ मध्ये त्यांची ओळख म्युच्युअल फंड आणि 'एनजे वेल्थ' प्लॅटफॉर्मशी झाली. मात्र, त्याच वर्षी आलेल्या जागतिक आर्थिक मंदीचा त्यांच्या सुरुवातीच्या पोर्टफोलिओवर मोठा परिणाम झाला. त्यामुळे त्यांनी काही काळ यातून माघार घेतली. सन २०१२मध्ये त्यांच्या आयुष्यात एक महत्त्वाचे वळण आले; जेव्हा त्यांनी 'सर्टिफाइड फायनान्शियल प्लॅनर'चा कोर्स पूर्ण केला. यामुळे त्यांची 'ॲसेट ॲलोकेशन' आणि दीर्घकालीन गुंतवणुकीबद्दलची समज अधिक प्रगल्भ झाली. नवीन आत्मविश्वासासह त्यांनी सन २०१३ मध्ये पुन्हा 'एनजे वेल्थ'मध्ये प्रवेश केला. त्यावेळी त्यांनी सुमारे ६५ लाख रुपये 'एयूएम' आणि २.५ लाखांच्या 'एसआयपी' बुकसह नव्याने सुरुवात केली. गेल्या काही वर्षांत, शिस्तबद्ध आर्थिक मूल्यांकन आणि भक्कम ग्राहक संबंधांच्या जोरावर त्यांच्या व्यवसायात सातत्याने वाढ झाली आहे. आज ते सुमारे १२० कोटी रुपयांचे 'एयूएम' आणि जवळपास ८० लाख रुपयांचे 'एसआयपी' बुक सांभाळत असून, ४००-४५० कुटुंबांना (सुमारे ७०० ग्राहक) सेवा देत आहेत. त्यांचे बहुतांश ग्राहक पुण्यात असले, तरी रेफरल्समुळे दिल्ली, नोएडा, चंदीगड आणि बेंगळुरू यांसारख्या शहरांमध्येही त्यांचा विस्तार झाला आहे. 'एनजे वेल्थ'चे तंत्रज्ञान आणि कार्यप्रणालीच्या पाठिंब्यामुळे ते आपल्या व्यवसायाचा विस्तार करत असून, येणाऱ्या काही वर्षांत ५०० कोटी रुपयांचे 'एयूएम' गाठण्याचे त्यांचे ध्येय आहे.

### समर्थ कॉलेजमध्ये ड्रोन वर्कशॉप व ड्रोन स्पर्धा उत्साहात संपन्न

नारायणगाव (दैनिक संध्या) : समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट,बेल्हे या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विशेष ड्रोन वर्कशॉप व ड्रोन कॉम्पिटिशन आयोजित करण्यात आले.या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ड्रोन ट्रेनर यश गुंजाळ यांनी विद्यार्थ्यांना ड्रोन तयार करण्यापासून ते ड्रोन यशस्वीपने उडविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाचे सखोल प्रात्यक्षिक दाखविले.कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना ड्रोन तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती देण्यात आली.ड्रोनची रचना,त्याचे कार्य,वापराची विविध क्षेत्रे,आधुनिक तांत्रिक बाबी तसेच भविष्यातील संधी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. आजच्या आधुनिक युगात शेती,संरक्षण,आपत्ती व्यवस्थापन,सर्वेक्षण,चित्रिकरण,वैद्यकीय सेवा अशा अनेक क्षेत्रांमध्ये ड्रोनचा प्रभावी वापर होत असल्याने विद्यार्थ्यांनी या तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळवणे अत्यंत आवश्यक असल्याचे यावेळी प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत ड्रोनचे बेसिक कंपोनंट्स,उड्डाण नियंत्रण प्रणाली,सेन्सर्सचा वापर,सुरक्षित उड्डाण पद्धती याबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण घेतले.

# सर्व जिल्ह्यांमध्ये ईएसआयसी रुग्णालये उभारण्याचा प्रयत्न

**कामगार मंत्री आकाश फुंडकर : नवीन कामगार संहितेनुसार 40 वर्षांवरील कामगारांसाठीच्या वार्षिक आरोग्य तपासणी शिबिराचा राज्यात शुभारंभ**

पुणे (दै. संध्या)

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये औद्योगिक क्षेत्राचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होत असून, त्या सर्व ठिकाणी कर्मचारी राज्य विमा निगमाची (ईएसआयसी) रुग्णालये उभारण्याचा शासनाचा प्रयत्न सुरू आहे, असे प्रतिपादन कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी केले.

पुण्यातील बिबवेवाडी येथील ईएसआयसी रुग्णालय येथे नवीन कामगार संहितेनुसार 40 वर्षांवरील कामगारांसाठीच्या वार्षिक आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह रमेश कर्मचारी राज्य विमा योजना आयुक्त रमेश चव्हाण, इतर वरीष्ठ इतर अधिकारी, तसेच कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवीन कामगार कायद्यांतर्गत प्रस्तावित केल्यानुसार, 40 वर्षे आणि त्यावरील वयोगटातील कामगारांसाठीचा हा देशव्यापी वार्षिक आरोग्य तपासणी उपक्रमाचा शुभारंभ आज कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ESIC) वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, बसैदारापूर, नवी दिल्ली येथे केंद्रीय कामगार आणि रोजगार तसेच युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांच्या हस्ते करण्यात आला. याच वेळी देशातील इतर 11 ESIC रुग्णालयांमध्येही सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आले. त्यामध्ये पुण्यातील ESIC रुग्णालयाचाही समावेश आहे.




पुण्यात आयोजित कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले कामगार मंत्री आकाश फुंडकर आपल्या भाषणामध्ये म्हणाले की कामगारांना कोणताही आजार उद्भवण्यापूर्वीच त्यांची आरोग्य तपासणी करणे हा सरकारचा मानस आहे. नियमित तपासणीमुळे गंभीर आजारांचे लवकर निदान होऊन कामगारांना मोठ्या आरोग्य धोक्यांपासून वाचवता येईल. सध्या राज्यात औद्योगिकीकरण वाढत असून कामगारांची संख्याही मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. अशा स्थितीत ईएसआयसी रुग्णालयांची गरज भासणार असून केंद्र सरकारसोबत यासंदर्भात सल्लामसलत करून रुग्णालयांची संख्या वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असेही कामगार मंत्री फुंडकर यांनी सांगितले.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी यावेळी औद्योगिक अपघातांमध्ये जखमी होणाऱ्या कामगारांना तत्काळ उपचार मिळण्याच्या दृष्टीने खासगी रुग्णालये आणि डॉक्टरांची मदत घेण्याबाबत सकारात्मक विचार करण्याची गरज व्यक्त केली. अनेक खासगी रुग्णालये आणि डॉक्टर ही सेवा मोफत देण्यास तयार आहेत, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते डॉ. दुधभाते यांच्या 'नेत्रकोष'चे प्रकाशन

**मुंबईत 'नेत्रकोष' पुस्तकाचे प्रकाशन; डोळ्यांच्या आरोग्यावर सोप्या भाषेत मार्गदर्शन**

पुणे (दै. संध्या)

पुण्यातील प्रख्यात नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. अनिल दुधभाते लिखित 'नेत्रकोष' या पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रसन्न वातावरणात पार पडले. साध्या आणि सोप्या भाषेत लिहिलेल्या या पुस्तकाचे अवलोकन करताना मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. या पुस्तकाला ज्येष्ठ नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. तात्याराव लहाने तसेच प्रसिद्ध 'दीक्षित डाएट' संकल्पनेचे जनक डॉ. जगन्नाथ दीक्षित यांची प्रस्तावना लाभली आहे. 'नेत्रकोष' या पुस्तकामध्ये डोळ्यांच्या विविध आजारांबाबत अत्यंत सोप्या आणि सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत माहिती देण्यात आली आहे. प्रत्येक आजाराचे कारण, तो टाळण्यासाठी घरच्या घरी करता येणाऱ्या उपाययोजना, तसेच आजार झाल्यास प्राथमिक पातळीवर कोणती काळजी घ्यावी आणि नेत्रतज्ज्ञांचा सल्ला केव्हा घ्यावा, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. डॉ. दुधभाते यांच्या सुमारे १५ वर्षांच्या अनुभवावर आधारित हे पुस्तक असून, विविध आजारांमधून बरे झालेल्या रुग्णांचे अनुभव आणि अभिप्रायही त्यांच्या स्वतःच्या भाषेत यात समाविष्ट करण्यात आले आहेत. हे पुस्तक वाचक आणि रुग्णांसाठी ऑनलाइन प्लॅटफॉर्म Amazon वर उपलब्ध असून लवकरच विविध पुस्तक विक्री केंद्रांवरही उपलब्ध होणार आहे. तसेच सिंहगड रोड येथील डॉ. दुधभाते नेत्रालय व रेटिना सेंटरमध्येही हे पुस्तक मिळणार आहे. या प्रकाशन सोहळ्यास आमदार अभिमन्यू पवार, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सौ. डिंपल दुधभाते, साहित्यिक गिरीश वसेकर, डॉ. स्नेहल मानपुत्र, तन्मय कारंजकर, कृष्णा सरवदे आदी मान्यवर उपस्थित होते.



## वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहन चालकांवर होणार कारवाई

नारायणगाव (दै. संध्या)

पुणे नाशिक महामार्गावरील आळेफाटा चौकाच्या मध्यभागी, हायवेच्या कडेला आणि दुकानांच्या समोर गाड्या बेशिस्तपणे लावल्या जात आहेत. या बेशिस्त वाहनांमुळे वाहतूक कोंडी आणि अपघाताचा धोका वाढत आहे .त्यामुळे बेशिस्त वाहने कुठेही उभी करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या चालकांवर आता दंड न करता गुन्हे नोंदविण्यास सुरुवात केली आहे .जानेवारी २०२६ ते एप्रिल २०२६ या चार महिन्यांच्या कालावधीत भारतीय न्याय संहिता कलम २८५ अंतर्गत जे नियम पाळून दिले आहेत ते मोडणाऱ्या १५ वाहन चालकांवर गुन्हे नोंदविण्यात आले आहेत .

आळेफाटा चौकात हॉटेल्स तसेच विविध प्रकारची दुकाने आहेत.त्यामुळे त्या चौकात गर्दी ही मोठ्या प्रमाणात असते .ही गर्दी आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी गुन्हे नोंदविले जात असल्याची प्रशासनाने सांगितले. वाहन चालकांनी वाहतूक नियमांचे पालन करा आणि नो पार्किंग क्षेत्रात वाहने उभी करू नयेत अन्यथा प्रशासनाकडून कडक कारवाई केली जाईल असे आवाहन पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांनी केले आहे.

## मुख्यमंत्र्यांचा 'तो' निर्णय स्वागतार्ह - डॉ. हुलगेश चलवादी

पुणे (दै. संध्या)

लैंगिक शोषणासारख्या घृणास्पद गुन्ह्यातील आरोपींना संचित रजा अर्थात 'पॅरोल' देऊ नये, या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या मंत्रिमंडळ बैठकीत दिलेले निर्देश अत्यंत धाडसी आणि सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने समर्थनिय आहेत. या निर्णयामुळे माता-भगिनींच्या सुरक्षेला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) प्रदेश उपाध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी गुरुवारी (ता.७) व्यक्त केला. अनेकदा लैंगिक अत्याचारातील आरोपी कारागृहातून पॅरोलवर बाहेर आल्यानंतर पुन्हा त्याच प्रकारचे गुन्हे करत असल्याचे दिसून आले आहे. आरोपी हे आधीच त्याच गुन्ह्यात अटक झालेले असतात आणि पॅरोलच्या काळात ते पुन्हा सक्रिय होतात. ही परिस्थिती समाजासाठी अत्यंत



घातक असल्याचे मत डॉ.चलवादी यांनी व्यक्त केले. २०१४ ते २०१९ या काळात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी अशा गुन्हेगारांना पॅरोल नाकारण्याचा कायदा अमलात आणला होता. दुर्दैवाने तांत्रिक कारणांमुळे तो कायदा न्यायालयात टिकला नाही. मात्र, आता पुन्हा एकदा विधी व न्याय विभागाला तसाच कडक कायदा करण्याचे निर्देश देऊन मुख्यमंत्र्यांनी आपली सामाजिक बांधिलकी सिद्ध केली आहे.

## महालक्ष्मी सरस २०२६मध्ये जागतिक दर्जाच्या थीम पॅव्हेलियनची भव्य मांडणी

पुणे (दै. संध्या)

महालक्ष्मी सरस २०२६ यंदा आपल्या भव्य थीम पॅव्हेलियन, आकर्षक सजावट आणि जागतिक दर्जाच्या संकल्पनेमुळे विशेष चर्चेत आले आहे. महाराष्ट्राची संस्कृती, ग्रामीण जीवन, महिला सक्षमीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा सुंदर संगम यंदाच्या पॅव्हेलियनमध्ये पाहायला मिळत आहे.

यंदाची मुख्य थीम महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या द्विशताब्दी वर्षाला समर्पित करण्यात आली आहे.

स्त्रीशिक्षण, सामाजिक परिवर्तन आणि शिक्षणप्रसारासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाला अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात आले आहे. मुख्य प्रवेशद्वार, बाह्य सजावट, मुख्य मंच आणि विविध भागांमध्ये फुले दांपत्यांचे विचार आणि कार्य




प्रभावी दृश्यरूपातून साकारण्यात आले आहे. यंदाच्या सरसमधील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे सुमारे ४० मीटर लांब आणि ७ मीटर उंचीचा भव्य त्रिमितीय एलईडी पडदा. अत्याधुनिक दृश्यतंत्रज्ञानाचा वापर करून उभारण्यात आलेल्या या पडद्यावर महिला बचत गट, ग्रामीण विकास, "लखपती दीदी" उपक्रम, तसेच महाराष्ट्राच्या संस्कृतीचे प्रभावी दृश्यरूप सादर करण्यात येत आहे. पडद्यावरील दृश्ये प्रत्यक्ष बाहेर येत असल्याचा अनुभव नागरिकांना मिळत असून, हा भाग विशेष आकर्षण ठरत आहे. महाराष्ट्रातील प्रदर्शन संस्कृतीमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात उभारण्यात आलेला हा दृश्य अनुभव जागतिक स्तरावरील प्रदर्शनांची अनुभूती देणारा ठरत आहे.

पॅव्हेलियनच्या बाह्य भागामध्ये कंटेनर संकल्पनेवर आधारित विशेष सजावट करण्यात आली आहे. हे कंटेनर प्रत्यक्ष वापरासाठी नसून, व्यापार, वाहतूक, शेतकरी आणि व्यवसाय व्यवस्थेमधील अतूट नाते दर्शवण्यासाठी प्रतीकात्मक स्वरूपात साकारण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील उत्पादने बाजारपेठेपर्यंत पोहोचवण्यात वाहतूक आणि व्यापार व्यवस्थेचे असलेले महत्त्व या माध्यमातून दाखवण्यात आले आहे.

तसेच यंदाच्या सजावटीमध्ये पिंगोळी कला, पारंपरिक महाराष्ट्राची कलाकुसर, पैठणी, नथ आणि ग्रामीण हस्तकलेचा सुंदर वापर करण्यात आला आहे.

आधुनिक प्रकाशयोजना आणि पारंपरिक सजावट यांचा संगम संपूर्ण परिसराला भव्यता प्रदान करत आहे.

महालक्ष्मी सरस २०२६ हे केवळ प्रदर्शन नसून, महाराष्ट्राची संस्कृती, ग्रामीण उद्योजकता आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा जागतिक दर्जाचा अनुभव ठरत आहे.

# विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी तंत्रज्ञानाधारित उद्योगांची गरज

***पद्मश्री मिलिंद कांबळे यांचे प्रतिपादन; भारतातील पहिल्या तीन दिवसीय 'ईआरपी प्रदर्शना'चे उद्घाटन***

पुणे (दै. संध्या)

"देशाच्या विकास प्रक्रियेत महत्वाचे योगदान देणाऱ्या सूक्ष्म, लघु व मध्यम (एमएसएमई) उद्योगांना सुयोग्य पद्धतीने कार्यान्वित करण्यासाठी, तसेच विकासाला गती देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करणे गरजेचे आहे. एआय, डिजिटायझेशन यामुळे उद्योगांची उत्पादकता वाढण्यास मदत होईल," असे प्रतिपादन दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज अर्थात डिक्कीचे संस्थापक पद्मश्री मिलिंद कांबळे यांनी केले. तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळेच २०४७ पर्यंत भारताची विकसनशील देश ही ओळख पुसून विकसित देश अशी ओळख निर्माण होईल, असेही त्यांनी नमूद केले.




पिंपरी-चिंचवड येथील ऑटोक्लस्टर एक्झिबिशन सेंटरमध्ये एक्स्पोनॉमिक्स इव्हेंट्सच्या वतीने आयोजित भारतातील पहिल्या 'ईआरपी' औद्योगिक प्रदर्शनाचे उद्घाटन मिलिंद कांबळे बोलत होते. प्रसंगी संयोजक 'एक्स्पोनॉमिक्स'चे संचालक सागर अहिवळे व मिलिंद हडप, आरती भोसले-अहिवळे, सनवन टेक्नॉलॉजीच्या संचालक श्रद्धा कुलकर्णी, अप्लिका कन्सल्टन्सीचे प्रमुख रॉड अल्बुकर्क, रिंगफिडर ट्रान्समिशनचे सीईओ दीपान रामलिंगम, इंद्रायणी इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष महेंद्र फणसे, रोटरी क्लब ऑफ पिंपरी इलाईटचे इरफान आवटे, प्रसाद कुलकर्णी, फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजचे सीईओ दिलीप बटवाल, डॉ. प्रकाश मुंडे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ध्वनिचित्रफितीद्वारे प्रदर्शनाचे कौतुक केले. यावेळी प्रदर्शनाविषयी माहिती असलेल्या मार्गदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. या तीन दिवसांच्या प्रदर्शनात उत्पादन, वित्त, लॉजिस्टिक्स, रिटेल, हेल्थकेअर, कन्स्ट्रक्शन आणि एडटेक या क्षेत्रांतील अत्याधुनिक ईआरपी आणि डिजिटल सोल्युशन्स सादर होणार आहेत. तज्ज्ञांची मार्गदर्शन सत्रे, कार्यशाळा व प्रात्यक्षिकांचा अनुभव घेता येणार आहे. हे प्रदर्शन येत्या शनिवारपर्यंत (ता. ९) सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. मिलिंद कांबळे म्हणाले, "विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी उद्योगांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान वापरले जावे. त्यातून मोठी रोजगारनिर्मिती होईल. भारतात येणारी थेट परदेशी गुंतवणूक सर्वाधिक ४० टक्के महाराष्ट्रात; त्यातही पुण्यातील उद्योग क्षेत्रात अधिक येते. महाराष्ट्राचे धोरण उद्योग व गुंतवणुकीला पूरक आहे. पुण्याला सर्वाधिक पसंती मिळत आहे. दावोसमध्ये होत असलेले सामंजस्य करार पूर्णत्वाकडे जाण्याचे प्रमाण ८० टक्क्यांपर्यंत आहे. कोरोना संकटकाळात भारताने मोठ्या प्रमाणात डिजिटल क्रांती केली आहे. उद्योगांनी 'ईआरपी' तंत्रज्ञान वापरावर अधिक भर दिला पाहिजे. 'एआय'मुळे उद्योगांचे आयाम बदलत आहेत. त्यामुळे एआय, डेटा सायन्स, मशीन लर्निंग व अन्य आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारणे ही काळाची गरज आहे."

प्रास्ताविकात सागर अहिवळे म्हणाले, "देशभरातील १०० हून अधिक ईआरपी कंपन्या, तंत्रज्ञान पुरवठादार आणि स्टार्टअप्स यामध्ये सहभागी झाल्या आहेत. उद्योग क्षेत्रातील डिजिटल परिवर्तनाला पुढे नेण्यासाठी आवश्यक दिशा आणि मार्गदर्शन देणारे हे प्रदर्शन 'डिजिटल भारत, विकसित भारत' संकल्पनेला गती देईल. महाराष्ट्राला स्मार्ट औद्योगिक राज्य म्हणून अधिक बळकट करेल. हा उपक्रम उद्योग क्षेत्रातील डिजिटल परिवर्तनाला चालना देण्यासाठी आणि 'एआय व ईआरपी: ट्रान्सफॉर्मिंग एंटरप्राईज एट स्केल' या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे."

श्रद्धा कुलकर्णी म्हणाल्या, "पुणे हे बहुआयामी शहर आहे. सांस्कृतिक व विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्याने गेल्या काही वर्षांत डिजिटल क्रांती घडवली. आयटी हब, इंडस्ट्री हब अशी ओळख मिळवली. आसपासच्या परिसरात उद्योगांचे मोठे जाळे पसरले आहे. त्यांचा सर्वांगीण विकास, जागतिक दर्जा आणि सक्षम उत्पादक निर्माण होण्यासाठी डिजिटल क्रांती उपयुक्त ठरणार आहे."

आरती भोसले-अहिवळे म्हणाल्या, "महाराष्ट्रातील तसेच देशातील उद्योगांना पारंपरिक कार्यपद्धतीतून बाहेर काढून स्मार्ट, डेटा-आधारित आणि तंत्रज्ञान-सक्षम औद्योगिक इकोसिस्टममध्ये रूपांतरित होण्यासाठी हे प्रदर्शन महत्वाचे ठरेल. तंत्रज्ञान आत्मसात केल्यास उद्योगांची कार्यक्षमता, पारदर्शकता आणि स्पर्धात्मकता वाढेल."

"एमएसएमई आणि एसएमई क्षेत्रातील उद्योगांना ईआरपी आणि एआय यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होईल. उद्योगांमध्ये नव्या भागीदारी आणि विकासाच्या संधी निर्माण होतील," असे मिलिंद हडप यांनी नमूद केले.

रॉड अल्बुकर्क, दीपान रामलिंगम, महेंद्र फणसे, प्रसाद कुलकर्णी, दिलीप बटवाल यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. राजेंद्र पाटणकर व दीपक म्हस्के यांनी सूत्रसंचालन केले. मिलिंद हडप यांनी आभार मानले.